# महाराष्ट्र विधानपरिषद

## तृतीय (हिवाळी) अधिवेशन, २०२१

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### राज्यात सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत येणाऱ्या परिचारिकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(१) ७०४ (१८-०३-२०२०) श्री.अंबादास दानवे, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.निलय नाईक : दिनांक १८ डिसेंबर, २०१९ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १ मधील प्रश्न क्रमांक २९००४ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत परिचारिकांच्या सर्व संवर्गामध्ये मिळून २४८१३ मंजूर पदांपैकी २८७५ पदे रिक्त असून तसेच वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभागांतर्गत एकूण ११९८१ मंजूर पदापैकी १३४१ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रिक्त पदांमुळे कार्यरत असलेल्या परिचारकांना १२ तासांपेक्षा जास्त वेळ रुग्णसेवा करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आरोग्य संचालनालयांतर्गत असलेल्या पदांवर राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत तसेच बंधपत्रित परिचारिकांना कंत्राटी पध्दतीने नियुक्ती देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने सार्वजनिक आरोग्य विभाग व वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभागातील परिचारिकांची रिक्त पदे भरण्याबाबत व रिक्त पदे भरुन परिचारकांना ८ तासांची ड्युटी आणि कंत्राटी परिचारिकांना किमान वेतन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२६-०७-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

दरम्यान सार्वजनिक आरोग्य विभागाची ५० टक्के रिक्त पदांसाठी पदभरती परीक्षा घेण्यात आली आहे. तसेच तत्कालीन सेवाप्रवेश नियमानुसार विशेष लेखी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या बंधपत्रित अधिपरिचारीकांना रिक्त पदी नियुक्ती देण्यात येवून अधिपरिचारीकांची रिक्त पदे भरण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) होय, हे खरे आहे.

(४) सार्वजनिक आरोग्य विभाग व वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभागातील परिचारिकांना ८ तासांची ड्युटी आणि कंत्राटी परिचारिकांना किमान वेतन देण्यात येते. मा.मंत्रिमंडळाच्या मान्यतेने ५० टक्के पदांकरीता दिनांक २८/०२/२०२१ रोजी पदभरती परीक्षा घेण्यात आली असून उमेदवारांना नियुक्तीही देण्यात आली आहे. उर्वरित १०० टक्के रिक्त पदांकरीता पदभरतीची मान्यता मिळाली असून त्यानुसार पदभरतीची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## गोपाळनगर, वरळी (मुंबई) येथील स्वस्त धान्य दुकानामध्ये निकृष्ट दर्जाचे अन्नधान्य वितरीत होत असल्याबाबत

**(२) २८२९ (०२-०६-२०२०) श्री.प्रविण दरेकर, डॉ.परिणय फुके, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विनायकराव मेटे, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोपाळनगर, वरळी (मुंबई) येथील स्वस्त धान्य दुकानामधून निकृष्ट दर्जाचे अन्नधान्य वितरीत होत असल्याची तक्रार प्राप्त झाल्याने लोकप्रतिनिधींनी सत्यता पडताळणीसाठी स्वस्त धान्य दुकानात छापा टाकला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर छाप्यामध्ये वरळी येथील स्वस्त धान्य दुकानामधून निकृष्ट अन्नधान्य पुरविण्यात येत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार अहवालाप्रमाणे दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ (१२-१०-२०२०) :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) संबंधित रास्तभाव दुकानात दिनांक ०१/०५/२०२० रोजी प्राप्त झालेल्या २४ गोण्यांपैकी ४ गोण्यात काडी-कचरा असल्याचे निदर्शनास आल्यानंतर सदर गहू गोदामातून बदलून देण्यात आला आहे. तसेच कचरा व काडी मिश्रित अन्नधान्य वितरित केल्याबद्दल संबंधित दुकानदाराची चौकशी करुन त्याच्याकडून दंड वसूल करण्यात आला आहे.

उपरोक्त गहू मानवी खाण्यास योग्य आहे किंवा कसे याबाबत जिल्हा सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा, कोकण भवन येथे तपासणी करण्यात आली आहे. सदर प्रयोगशाळेकडून प्राप्त अहवालानुसार संबंधित दुकानदाराकडे प्राप्त झालेला गहू Food Products Standards and Food Additives Regulations, २०११ नुसार सुरक्षित व प्रमाणित असल्याचे निदर्शनास आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## निमकवळा (ता.खामगांव, जि.बुलढाणा) येथील निम्म ज्ञानगंगा प्रकल्पामध्ये अनियमितता झाल्याबाबत

**(३) ३३७४ (२९-०५-२०२०) श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निमकवळा (ता.खामगांव, जि.बुलढाणा) येथील निम्म ज्ञानगंगा प्रकल्प २ मध्ये अनियमितता झाल्यासंदर्भात जिल्हाधिकारी यांच्याकडे शेतकऱ्याने तक्रार केली असता या तक्रारीवर चौकशी समिती गठीत करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रकल्पातील गेट समोरील व गेटचे काम निकृष्ट झाले असून प्रकल्पात ४० ते ५० टक्के पाणी अडविण्याचे आदेश असताना दोन वेळा प्रकल्प १०० टक्के भरला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (१२-०८-२०२०) :** (१) निमकवळा (ता.खामगांव जि.बुलढाणा) येथील निम्न ज्ञानगंगा प्रकल्प-२ मध्ये अनियमितता झाल्या संदर्भातील तक्रार अर्जाची प्रत विभागीय अथवा मंडळ कार्यालयास प्राप्त झाली नाही, सबब, याबाबत जिल्हाधिकारी, बुलढाणा यांचेकडे तक्रारीची प्रत मिळणे व चौकशी समिती गठीत करण्यात आली किंवा कसे याबाबत विचारणा केली असता, जिल्हाधिकारी कार्यालयाचे पत्र दिनांक १५/०६/२०२० अन्वये तक्रारीची प्रत कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, बुलढाणा यांना पाठविली असून, सदर पत्रामध्ये कास्तकाराने केलेल्या तक्रारीबाबत चौकशी समिती गठीत केल्याचे अवगत केले नाही.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

प्रकल्पाच्या सिंचन विमोचकाचे गेट व अनुषंगिक कामे यांत्रिकी विभाग, अकोला यांचेमार्फत काम करुन घेण्यात येत आहेत व काही कामे अद्याप करावयाचे बाकी आहेत. त्यामुळे काम निकृष्ट दर्जाचे झाले असे

म्हणणे उचित नाही. निम्न ज्ञानगंगा धरणाच्या प्रथम वर्षी पाणी साठा मर्यादित करण्याबाबत कोणतेही परिपत्रक प्रचलित नाही. प्रकल्पाची घळभरणी मार्च, २०१९ रोजी पूर्ण करण्यात आलेली असून प्रकल्पामध्ये पाणीसाठा निर्मिती करण्याचे प्रथम वर्ष होते. निम्न ज्ञानगंगा २ प्रकल्पाचे पाणलोट क्षेत्रात अतिवृष्टी झाल्यामुळे दिनांक २६/०९/२०१९ व दिनांक ०२/११/२०१९ रोजी प्रकल्प २ वेळा १०० टक्के भरला, ही बाब खरी आहे.
(३) जिल्हाधिकारी कार्यालयाचे पत्र दि १५/०६/२०२० च्या पत्रान्वये तक्रारीची प्रत कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, बुलढाणा यांना प्राप्त झाली आहे. सदर पत्रान्वये जिल्हाधिकारी, बुलढाणा यांनी १) कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, बुलढाणा, २) उपजिल्हाधिकारी संपादन (लसिका), बुलढाणा, ३) उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, खामगाव, ४) जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी, बुलढाणा, ५) जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख, बुलढाणा यांना ७ दिवसाचे आत अहवाल सादर करणेबाबत कळविले आहे. त्यावर कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, बुलढाणा यांनी त्यांचे पत्र दिनांक १५/०६/२०२० अन्वये जिल्हाधिकारी, बुलढाणा यांना अहवाल सादर केला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## विदर्भातील सिंचन प्रकल्प पूर्ण करण्याबाबत

**(४) ३३९२ (०२-०६-२०२०) श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भातील किती सिंचन प्रकल्प पूर्ण झाले व किती सिंचन प्रकल्पाचे काम सुरु आहे अशी विचारणा मा.उच्च न्यायालय, मुंबईच्या नागपूर खंडपीठाने विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाला केल्याचे दिनांक २७ फेब्रुवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाबाबत पाटबंधारे विकास महामंडळाने याबाबत खुलासा केला वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (१३-०८-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार वेळोवेळी विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांच्यामार्फत मा.उच्च न्यायालयात माहिती सादर करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील नागरिकांना पारदर्शक, कार्यक्षम, समयोचित सेवा देण्यासाठी लागू करण्यात येणाऱ्या सेवा हमी कायद्याबाबत

**(५) ४१७८ (१०-०४-२०१५) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नागरिकांना पारदर्शक, कार्यक्षम, समयोचित सेवा देण्यासाठी लागू करण्यात येणाऱ्या सेवा हमी कायद्याचा मसुदा शासनाने दिनांक १८ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास नागरिकांच्या सूचना व हरकतीसाठी खुला केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कायद्यात लोकांना नेमक्या कोणत्या सेवा देणार, किती दिवसात देणार यासंदर्भात माहिती नसल्याने नागरिक संभ्रमित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सेवा हमी कायद्याचा मसुदाबाबत नागरिकांच्या सुचना व हरकती आल्या आहेत काय,

(४) असल्यास, नागरिकांच्या सुचना व हरकतीनुसार या कायदात बदल करण्यात आला किंवा येत आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त कायद्याचे स्वरूप काय व त्याची त्वरित अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.उध्दव ठाकरे (१५-०६-२०१५) :** (१) होय.
(२) नाही.
(३), (४) व (५) नागरिक, अशासकीय संस्था तसेच शासकीय अधिकारी यांचेकडून प्राप्त हरकती/सूचना विचारात घेऊन महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ तयार करण्यात आले असून ते विधानसभेत दिनांक ८ एप्रिल, २०१५ रोजी मांडण्यात आले आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बीड तालुक्यातील रस्त्यांचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(६) ४४४० (१६-०७-२०२०) श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड तालुक्यातील ढेकणमोहा-आंबेसावळी-मण्यारवाडी-घाटजवळा फाटा व ढेकणमोहा ते काळेगाव ह्या रस्त्याचे काम संबंधित कंत्राटदाराच्या बेजबाबदारपणामुळे गत वर्षभरापासून अपूर्णावस्थेत असल्यामुळे गावकऱ्यांना नाहक त्रास सहन करावा लागत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लिंबागणेश ते काठवते वस्ती-अंजनवती-घारगाव (ता.जि.बीड) हा ६.८ कि.मी.चा रस्ता अंदाजे किंमत ४ कोटी ८७ लाख रुपये निविदेप्रमाणे प्रस्तावित असताना सुध्दा संबंधित कंत्राटदाराने सदर रस्ता नियोजित जागेवर न करता स्वतःच्या हितासाठी लिंबागनेश ते अंजनवती थेट करण्याचा प्रयत्न केल्याची लेखी तक्रार संबंधित गावातील लोकप्रतिनिधींनी पालकमंत्री व जिल्हाधिकारी यांचेकडे केली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषी कंत्राटदारावर कारवाई करुन उक्त रस्ते पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१०-०८-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

सदर रस्त्याची कामे प्रगतीपथावर असताना गावकऱ्यांनी व रस्त्या लगतच्या शेतकऱ्यांनी अडवणुक केल्याने रस्ता पूर्ण होण्यास विलंब झालेला आहे. तथापि, या संदर्भात संबंधित ठेकेदारास दंड आकारण्यात आला आहे. सदर रस्त्याचे उर्वरीत काम पावसाळा संपल्यावर पूर्ण करण्यात येईल.

(२) याबाबत तक्रार प्राप्त झाली आहे.

अंजनवती ते काटवटस्ती या लांबीत रस्ता करण्यात यावा अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी केली होती हे खरे आहे. परंतु रामा ५६ लिंबागणेश जवळ ते काटवटस्ती अंजनवस्ती घारगांव हे काम मंजूर अंदाजपत्रकाप्रमाणे सुरू करण्यात आलेले आहे. अंजनवस्ती ते काटवटवस्ती हे अंतर १.७५० कि.मी. असून सदर लांबीचा कोअर नेटवर्क मध्ये समावेश आहे. सदर लांबीतील काम आता करण्यात येत आहे.

अंजनवस्ती ग्रामपंचायत यांनी सध्या प्रगतीत असलेल्या कामाबाबत कसलीही तक्रार नसल्याबाबत लेखी कळविले आहे.

(३) व (४) सदर तक्रारीच्या अनुषंगाने मुख्य अभियंता यांच्या मार्फत चौकशी सुरु असून अहवाल प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

---

## जालना जिल्ह्यात अँटी कोरोना फोर्सची स्थापना केल्याबाबत

**(७) ४४८० (३०-०७-२०२०) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्हा प्रशासनाने जिल्ह्यातील ९८५ गावांमध्ये अँटी कोरोना फोर्सची स्थापना केली असून या फोर्सने प्रतिबंधात्मक उपाययोजनेसह पर जिल्ह्यातून येणाऱ्या व्यक्तींवर नजर ठेवणे गरजेचे असताना ग्रामसेवक गावात आले नसल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (२७-०७-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) होय, संबंधित ०२ ग्रामसेवक व ०२ ग्रामविकास अधिकारी यांच्यावर निलंबनाची कार्यवाही करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील सर्व मंडळाच्या शाळा महाविद्‌यालयातील विद्‌यार्थ्यांची परीक्षा एकाच वेळी घेण्याबाबत

**(८) ४७८९ (०८-१२-२०२०) श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सर्व मंडळाच्या शाळा तसेच महाविद्‌यालयातील विद्‌यार्थ्यांची परीक्षा एकाच वेळी घेण्यात यावी अशी मागणी मा.मुख्यमंत्री महोदयांनी मा.पंतप्रधान महोदयांसमवेत व्हीडीओ कॉन्फरन्सव्दारे दिनांक १६ जून, २०२० रोजी आयोजित केलेल्या बैठकीत करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड (०८-०९-२०२१) :** (१) मा.पंतप्रधान महोदयांची मा.मुख्यमंत्री महोदयांसमवेत बैठक दिनांक १७ जून, २०२० रोजी व्हीडीओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून पार पडली आहे. या बैठकीचे इतिवृत्त केंद्र शासनाकडून अद्‌याप प्राप्त झाले नाही.
(२) कोविड-१९ रोगाच्या प्रादुर्भावामुळे उद्‌भवलेल्या असामान्य परिस्थितीमुळे, सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षासाठी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या इ.१० वी इ.१२ वी च्या घेण्यात येणाऱ्या परीक्षा अनुक्रमे दिनांक १२ मे, २०२१ व दिनांक ११ जून, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये रद्द करण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोरोना महामारीमध्ये जलसंपदा विभागावर मंजूर तरतूदीपेक्षा अतिरिक्त खर्च झाल्याबाबत

**(९) ४८१९ (१४-११-२०२०) श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.महादेव जानकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य घटनेप्रमाणे राज्य सूचीतील विषयांची जबाबदारी राज्य शासनाकडे असून, सार्वजनिक आरोग्य हा विषय राज्य सूचीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोनावर नियंत्रण करण्याची जबाबदारी शासनाची असतानाही, स्थानिक स्वराज्य संस्था जसे की ग्रामपंचायत, नगरपालिका इत्यादींना कोणतीही मदत दिली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोरोना संकटाची तीव्रता लक्षात घेता दिनांक ११ मार्च ते ३१ मार्च, २०२० नंतर प्रामुख्याने राज्यात सर्वाधिक खर्च आरोग्याच्या सुविधा उभारण्यावर म्हणजे व्हेंटीलेटर खरेदी, ऑक्सीजनयुक्त बेडची उभारणी तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांना आरोग्याच्या सुविधा उभारण्यासाठी खर्च करणे अपेक्षित असताना, जलसंपदा विभागावर मंजूर तरतुदीपेक्षा अतिरिक्त खर्च करण्यात आला असून स्थानिक स्वराज्य संस्थांना निधी न दिल्यामुळे, कोरोनाचा महाराष्ट्रात सर्वात जास्त संसर्ग होऊन व्हेंटीलेटर अभावी तर कधी वेळेत ॲम्ब्युलन्स न मिळाल्याने सर्वाधिक म्हणजे ४२००० पेक्षा अधिक मृत्यू झाले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जलसंपदा विभागावर मंजूर तरतूद रुपये ३२१४ कोटी असताना रुपये ३६१४ कोटी खर्च करण्यात आला व दिनांक ३१ मार्च, २०२० अखेर सार्वजनिक आरोग्य विभागावर मंजूर केलेल्या रुपये २५१५ कोटींपैकी रुपये १७८४ कोटी खर्च करण्यात आला व दिनांक १ एप्रिल ते १५ जुलै, २०२० या कालावधीत वेतनाव्यतिरिक्त रुपये १२५४ कोटी सार्वजनिक आरोग्य विभागावर खर्च करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, आरोग्य सुविधांवर निधी खर्च न करता जलसंपदा, सहकार व अन्न व नागरी पुरवठा इत्यादी विभागांना निधी देत असताना स्थानिक स्वराज्य संस्थांना कोरोना नियंत्रणासाठी निधी न देण्याची कारणे काय आहेत,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने झालेल्या अनियमिततेची चौकशी करुन संबंधितांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार (२४-०६-२०२१) :** (१) होय.

(२) स्थानिक स्वराज्य संस्थांना राज्य शासनाकडून देय निधी (उदा. वस्तु व सेवा कर आणि जकात करामुळे द्यावयावी भरपाई) व्यतिरिक्त १५ व्या वित्तीय आयोगाच्या शिफारशीनुसार दिनांक १ एप्रिल, २०२० ते ३१ मार्च, २०२१ या कालखंडात केंद्र शासनाकडून राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बळकटीकरणासाठी राज्याला बेसिक आणि टाईड ग्रँट या दोन प्रकारचा प्राप्त निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. या व्यतिरिक्त महाराष्ट्र कोविड-१९ उपाययोजना नियम, २०२० याखाली अनुज्ञेय उपाययोजनांसाठी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) च्या एकूण नियतव्ययातील कमाल ५ टक्केपर्यंत अतिरिक्त निधी सार्वजनिक आरोग्य विभाग व वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभागांच्या जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांना उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत.

(३) राज्य शासकीय रुग्णालयातील उपलब्ध व्हेंटीलेटर्स शिवाय CSR मधून उपलब्ध व्हेंटीलेटर्स व केंद्र शासनाकडून तातडीची मदत म्हणून उपलब्ध व्हेंटीलेटर्स तसेच स्थानिकस्तरावर जिल्हानिहाय खरेदी केलेले व्हेंटीलेटर्स याशिवाय खाजगी रुग्णालयातील नियमन करण्यात आलेल्या ८०% खाटांमध्ये व्हेंटीलेटर्स सुविधेच्या खाटांही रुग्णांच्या उपचारासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. ऑक्सिजनचा पुरवठा पुरेशा प्रमाणात व्हावा, यासाठी जंबो सिलिंडर्स, बी-टाईप सिलिंडर्स आणि डयुरा सिलिंडर्स उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. राज्यातील २६ जिल्हयांमध्ये ऑक्सिजन टॅक सुरु करण्यात आले आहेत.

केंद्र शासनाकडून राज्याला ४,३८४ व्हेंटीलटरर्स प्राप्त झाले आहेत. राज्यात पुरेशा प्रमाणात ऑक्सिजन बेडस आणि व्हेंटीलटरर्स उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत.

(४) जलसंपदा विभागासाठी सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षासाठी रुपये १५,६५१ कोटी इतके सुधारित अंदाज मंजूर असून त्यापैकी रुपये १३,६१२ कोटी इतका निधी मार्च, २०२० अखेर खर्च झालेला आहे. तसेच, सार्वजनिक आरोग्य विभागासाठी सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षासाठी रुपये १०,६८६ कोटी इतके सुधारित अंदाज मंजूर असून त्यापैकी रुपये ९,५७० कोटी इतका निधी मार्च, २०२० अखेर खर्च झालेला आहे.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर येथील कोरोना बाधितांच्या रूग्ण संख्येत तफावत असल्याबाबत

**(१०) ४८६२ (२३-११-२०२०) श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रशांत परिचारक, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याची उपराजधानी नागपूर येथील नागपूर महानगरपालिका आणि विभागीय आयुक्त कार्यालयाच्या अहवालात कोरोना बाधितांच्या रूग्णसंख्येत तफावत असून दिनांक २३ सप्टेंबर, २०२० च्या अहवालात नागपूर शहरात ५३ हजार ५६८, ग्रामीण भागात १३ हजार ७१६ व जिल्हा बाहेरील ८ असे एकूण ६७ हजार १७१ कोरोना बाधित आढळल्याचे दर्शविण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुसऱ्या दिवशी शहरात केवळ ८१७ बाधित वाढल्यावरही शहरातील एकूण बाधितांची संख्या ५७ हजार २०४ व शहरासह ग्रामीणचे ३०० व जिल्ह्याबाहेरील ९ असे एकूण ७१६१६ दाखविली असून महानगरपालिका आणि जिल्हा चिकित्साकडून संख्येच्या दुरूस्तीची प्रक्रिया सुरु असताना ४ हजार रूग्ण संख्येत तफावत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२८-०७-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अहवाल सादरीकरणाच्या वेळेतील फरकामुळे संपूर्ण जिल्हयाचे अहवाल सादरीकरण व म.न.पा.चे अहवाल सादरीकरण यात काही अंशी तफावत आलेली होती. मात्र सदर बाब लक्षात आल्यामुळे म.न.पा. यांना सदर तफावत लक्षात आल्यामुळे म.न.पा. यांना सदर तफावत निदर्शनास आणून दिलेली आहे. दिनांक २३/०९/२०२० रोजी एकूण रुग्ण ६७६७१ आहेत. दिनांक २४/०९/२०२० रोजी नवीन ११२६ रुग्णांची नोंद झालेली आहे. या अहवालाप्रमाणे दिनांक २४/०९/२०२० रोजी ६८७९७ इतकी रुग्णसंख्या नोंदविणे अपेक्षित होती. तथापि, आयसीएमआर पोर्टलवरील ७१६१६ चा अहवाल प्राप्त होता. दोन वेगवेगळया स्त्रोतातून आकडेवारी आली होती. त्यापैकी आयसीएमआर पोर्टलवरील आकडेवारी ग्राहय धरण्यात आली होती.

(३) दोन वेगवेगळया स्त्रोतातून आलेल्या अहवालामुळे आकडेवारीत तफावत दिसून आली होती. सदर तफावत माहिती घेऊन दुरुस्ती करण्यात आली.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोविड-१९ आजार वैद्यकीय प्रतिपूर्ती योजनेत समाविष्ट करणेबाबत

**(११) ४९३६ (१४-१२-२०२०) श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.बाळाराम पाटील, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.मोहनराव कदम, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड : दिनांक ८ सप्टेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ६ मधील प्रश्न क्रमांक २८९० ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शिक्षक व कर्मचाऱ्यांना वैद्यकीय उपचारासाठी आजाराची सूची शासनाने निश्चित केलेली आहे व त्यानुसार त्यांच्या वैद्यकीय देयकांची प्रतिपुर्ती केली जाते, त्या उपचारांच्या यादीमध्ये कोरोना व सारी सारख्या आजारांचा समावेश करण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे काय,

(२) असल्यास, राज्यात कोविड-१९ चा संसर्ग मोठ्या प्रमाणात वाढत असून त्याचा प्रादुर्भाव अनेकांना झाला आहे, कोविड-१९ या संसर्ग आजाराची वैद्यकीय प्रतिपूर्ती योजनेत समाविष्ट करणेसाठी लोकप्रतिनिधींनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नांदेडसह राज्यात हजारो शिक्षकांना कोरोनाची बाधा झाली असून उपचारासाठी त्यांचे लाखो रुपये खर्च झाले असून कोरोनाचा समावेश गंभीर आजारांच्या यादीत नसल्यामुळे वैद्यकीय प्रतिपूर्ती देयकांपासून ते वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोविड-१९ हा आजार वैद्यकीय प्रतिपूर्ती योजनेत समाविष्ट करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२६-०३-२०२१) :** (१) राज्य शासकीय कर्मचारी व त्यांचे कुटुंबिय यांनी खाजगी रुग्णालयात घेतलेल्या उपचाराच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीकरीता, विभागाच्या दिनांक १९/०३/२००५ च्या शा.नि. अन्वये आकस्मिक व गंभीर आजारांची यादी निश्चित करण्यात आलेली आहे. या यादीमध्ये “Pulmonary Emergency” या आजाराचा समावेश असून त्यात श्वासोश्वासाचा त्रास असलेल्या सारी व कोरोना रुग्णांचा अंतर्भाव होतो.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) या विभागाच्या दिनांक १७ डिसेंबर, २०२० च्या शा.नि. अन्वये वैद्यकीय प्रतिपूर्तीकरीता शासन विर्निदिष्ट आकस्मिक आजारांच्या यादीत “कोविड-१९” या आजाराचा समावेश केला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

___________

## घणसोली, नवी मुंबई औद्योगिक क्षेत्रातील नाल्यातून विविध रंगाच्या रासायनिक द्रव्यांचा विसर्ग होत असल्याबाबत

**(१२) ५०१० (१२-११-२०२०) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घणसोली, नवी मुंबई औद्योगिक क्षेत्रातील नाल्यामधून विविध रंगाच्या रासायनिक द्रव्यांचा विसर्ग केला जात असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औद्योगिक क्षेत्रातील नाल्यामधून होत असलेल्या रासायनिक द्रव्यांच्या विसर्गामुळे स्थानिक नागरिकांना रसायनांच्या उग्र वासामुळे श्वासाचा त्रास होत असल्याचे निदर्शनास आले, तसेच उक्त नाल्यांमध्ये रबाळे औद्योगिक क्षेत्रामधून निळया रंगाचा रासायनिक द्रव्ये सोडण्यात येत असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन स्थानिक नागरिकांच्या आरोग्याला निर्माण झालेला धोका लक्षात घेता याबाबत कार्यवाही करुन त्यास जबाबदार असणाऱ्या कारखान्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे (०३-०९-२०२१) :** (१) हे खरे नाही. तथापि, टीटीसी औद्योगिक क्षेत्रातील कंपन्यांकडून नाल्यात सांडपाणी सोडत असल्याबाबतची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे ऑक्टोबर, २०२० मध्ये महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे केली होती.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत टीटीसी औद्योगिक क्षेत्रामध्ये केलेल्या पाहणीदरम्यान आढळलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळास दिनांक ०२/११/२०२० रोजी निर्देश देण्यात आले होते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जायकवाडी प्रकल्पाच्या पाणीपट्टी वसूली व पाणी वाटप व्यवस्थेबाबत

**(१३) ५१०९ (१४-१२-२०२०) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जायकवाडी धरणाच्या सिंचन प्रकल्पाचे व्यवस्थापन व पाणीपट्टी वसुलीबाबत गोदावरी पाटबंधारे महामंडळाने खाजगी वसुली करण्याबाबतचा ठराव शासनाकडे सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत थोडक्यात माहिती काय आहे,

(३) तसेच, शेतकऱ्यांना सिंचनाचे पाणी मिळणे व पाणीपट्टी वसुलीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (१५-०६-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रकल्पाची सिंचन कार्यक्षमता वाढविण्यासाठी सिंचन व्यवस्थापन बाहय अभिकरणाकडून करण्याबाबत प्रस्तावित आहे.

प्रायोगिक तत्त्वावर, जायकवाडी प्रकल्पाच्या पैठण डावा कालवा वितरिका क्र. २६ वरील साधारणत: ५००० हे. क्षेत्राचे सिंचन व्यवस्थापन बाहय अभिकरणामार्फत करण्याचे नियोजित आहे.

(३) जायकवाडी प्रकल्पावर, महाराष्ट्र सिंचन अधिनियम १९७६ नुसार शेतकऱ्यांना सिंचनाकरीता पाणीपुरवठा करण्यात येतो व शासनाच्या प्रचलित नियमानुसार पाणीपट्टी वसुली करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात विविध रूग्णालयातील अस्थायी परिचारीकांचे वेतन कमी केल्याबाबत

**(१४) ५२१३ (२३-११-२०२०) श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अनिकेत तटकरे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोनासारख्या महामारीच्या काळात स्वत:चा जीव धोक्यात घालून आरोग्य सेवेचे काम करणाऱ्या परिचारीकांना शासनाने विशेष भत्ता द्यावा अशी संघटनेने शासनाकडे मागणी केली असल्याचे दिनांक १७ मे, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असून राज्यातील दुर्गम भागात सेवा देणाऱ्या परिचारीकांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत असल्यामुळे त्यांना सोयी सुविधा देणे आवश्यक आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, राज्यात विविध रूग्णालयातील अस्थायी परिचारीकांचे दिनांक २९ एप्रिल रोजी आदेश काढून वेतन कमी करुन रुपये २५ हजार करण्याचा परिपत्रक काढण्यात आल्याचे दिनांक ११ जून, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १९८७ व आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ अंतर्गत कोविड-१९ विषाणू प्रादुर्भाव काळात कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना कोणतीही पूर्वसूचना न देता कार्यमुक्त करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, कोरोना महामारीतही अस्थायी परिचारीकांनी कायमस्वरूपी परिचारीकांएवढेच काम करूनही वेतन कमी करण्याच्या सदर आदेशाविरूध्द मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने याबाबत शासनास उत्तर देण्याचे निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने परीचारिकांना विशेष भत्ता व दुर्गम भागात सेवा देणाऱ्या परीचारिकांना सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच अस्थायी परीचारिकांच्या संदर्भातील सदर आदेश रद्द करण्याबाबत व कंत्राटी कर्मचाऱ्यांना सेवेत सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२६-०७-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

राज्यातील आदिवासी, नक्षलग्रस्त व दुर्गम भागातील कार्यरत परिचारीकांना दुर्गम भत्ता देण्यात येतो. तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान यांच्या पत्रानुसार कार्यरत कंत्राटी परिचारीकांना प्रोत्साहन भत्ता मंजूर

करण्यात आलेला आहे. तसेच राज्यात कोरोनासारख्या महामारीच्या काळात स्वत:चा जीव धोक्यात घालून आरोग्य सेवेचे काम करणाऱ्या परिचारीकांना आरोग्य कवच म्हणून ५० लाखाचा विमा अनुज्ञेय आहे.

(२) होय, हे खरे आहे.

वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०१९/प्र.क्र.२२/कोषा प्रशा-४, दिनांक २९/०१/२०२० अन्वये कंत्राटी सेवेतील कर्मचाऱ्यांचे परिश्रामिक/मानधन प्रदानाबाबत परिपत्रक निर्गमित करण्यात आलेले आहे. त्यानुसार सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र. बंधप-२०२०/प्र.क्र.२०२/सेवा-५, दिनांक २९/०४/२०२० अन्वये बंधपत्रित अधिपरिचारीकांचे दरमहा रुपये २५,०००/- इतके ठोक मानधन अदा करण्याचे निश्चित करण्यात आलेले आहे.

(३) हे खरे नाही.

आयुक्तालयाच्या पत्रानुसार ज्या केंद्रावर सद्य:स्थितीत रुग्ण नाहीत अशी केंद्र तात्पुरती बंद करण्यात यावी व अशा ठिकाणी नेमलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवा संपुष्टात आणाव्यात तसेच सदर केंद्र पुन्हा सुरू केल्यास, सद्य:स्थितीत कमी केलेल्या कर्मचाऱ्यांना नियुक्ती देण्यात यावी असे नमूद केले आहे.

(४) होय, हे खरे आहे.

नागपूर विभागातील काही बंधपत्रित आधिपरिचारीकांनी मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, नागपूर येथे मुळ अर्ज दाखल केल्याने त्यावर शासनाने शपथपत्र दाखल केले आहे.

(५) मुद्दा क्र.१ मध्ये नमूद केल्यानुसार विशेष भत्ता/प्रोत्साहनपर भत्ता देण्यात येतो. अस्थायी परिचारीका ह्या कंत्राटी कर्मचारी असल्याने त्यांना ठोक मानधन देण्यात येते. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार कर्मचाऱ्यांनी शासन सेवेत सेवाप्रवेश नियमानुसार विहित कार्यपध्दतीने प्रविष्ट होणे आवश्यक आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अनुदानित आश्रमशाळेत सेमी इंग्रजीचे वर्ग सुरू करण्याबाबत

**(१५) ५३१८ (१४-१२-२०२०) डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय व अनुदानित आश्रमशाळांची वेळ सकाळी ११ ते ५ करणे शासकीय आश्रमशाळेत सेमी इंग्रजीचे वर्ग सुरू करणे या बाबी शासनाच्या विचाराधीन असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासकीय आश्रमशाळेतील शिक्षण विभाग व वसतिगृह विभाग स्वतंत्र करण्याबाबत शासन विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शासकीय व अनुदानित आश्रमशाळांची वेळ सकाळी ११ ते ५ करणे तसेच शासकीय आश्रमशाळेत सेमी इंग्रजीचे वर्ग सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (०९-०९-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) शासकीय आश्रमशाळेत शालेय इमारत व वसतिगृह इमारत स्वतत्र असतात.

(३) आयुक्तालयाच्या दिनांक २१/८/२०१९ व दिनांक २८/८/२०१९ रोजीच्या पत्रान्वये शासकीय व अनुदानित आश्रमशाळांची वेळ सकाळी ११ ते ५ करण्यात आली आहे.

शासकीय व अनुदानित आश्रमशाळांमध्ये ऐच्छिक स्वरूपात सेमी इंग्रजी माध्यमाच्या वर्गांना शासन निर्णय, दिनांक १८/९/२०१९ अन्वये मंजुरी देण्यात आली आहे. त्याप्रमाणे इंग्रजी सेमी इंग्रजीचे वर्ग सुरू आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौजे दुर्वेस काटेलपाडा (ता.जि.पालघर) येथे येण्या-जाण्यास रस्ता नसल्याने ग्रामस्थांची गैरसोय होत असल्याबाबत

**(१६) ५४६० (२०-११-२०२०) श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे दुर्वेस काटेलपाडा (ता.जि.पालघर) येथे येण्या-जाण्यास रस्ता नसल्याने ग्रामस्थांना दळण-वळणाची गैरसोय होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दळण-वळणाची व्यवस्था नसल्याने झोळीने घेऊन जाणाऱ्या गर्भवतीचा दिनांक ११ सप्टेंबर, २०२० रोजी मृत्यू झाल्याने जिल्हा परिषद सदस्य यांनी दिनांक १६ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्या निवेदनाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१३-०७-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) स्थानिक लोकप्रतिनिधींचे निवेदन प्राप्त झाले आहे हे खरे आहे.

(३) मौजे दुर्वेस काटेलपाडा हा रस्ता ग्रामीण मार्ग क्र.११६ असून रस्त्याची एकूण लांबी १.५० कि.मी. आहे.

सदर लांबीपैकी काही लांबीतील रस्ता खाजगी मालकीतील जमिनीतून जात असल्याने जिल्हा परिषदेस सदर लांबीमध्ये काम करणे शक्य झालेले नाही.

तथापि, खाजगी जमीन धारकांच्या मालकीच्या जमिनीवर रस्ता बांधण्यासाठी जमीन धारकांची संमती मिळवण्याचा प्रयत्न करण्यात येत असून जमीन मालकांची संमती मिळाल्यानंतर या लांबीतील रस्त्याचे काम रस्ते व पूल दुरुस्तीच्या योजनेंतर्गत हाती घेण्याचे प्रयत्न आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जामगे (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथील लघुपाटबंधारे योजनेसाठी भूसंपादन केलेल्या शेतकऱ्यांना मोबदला देण्याबाबत

**(१७) ५४७० (२३-११-२०२०) श्री.रामदास कदम :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जामगे (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथील लघुपाटबंधारे योजनेसाठी भूसंपादन केलेल्या शेतकऱ्यांना मोबदला देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने जामगे येथील लघुपाटबंधारे योजनेसाठी भूसंपादन केलेल्या शेतकऱ्यांना मोबदला देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शंकरराव गडाख (०२-०८-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) जानेवारी, २०१० मध्ये योजनेसाठी लागणाऱ्या जमिनीची संयुक्त मोजणी झाल्यानंतर प्रकल्पग्रस्तांनी संमती दिल्यानंतर धरणाचे काम सुरु करण्यात आले आहे. मौजे जामगे/एस/आर/५११ भूसंपादन प्रकरणी रुपये ९५८.७९ लक्ष रकमेचा अंतिम निवाडा दिनांक ०१/०६/२०१५ रोजी उपविभागीय अधिकारी, दापोली यांनी जाहीर केला आहे. सदर भूसंपादन प्रकरणी रुपये ९५८.७९ लक्ष इतकी रक्कम उपविभागीय अधिकारी, दापोली या कार्यालयास जमा करण्यात आलेली आहे. योजनेसाठी संपादित करावयाच्या जमिनीचा मोबदला संबंधित शेतकऱ्यांना अदा करावयाची कार्यवाही उपविभागीय अधिकारी, दापोली यांचे मार्फत करणेत येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पाटोदा (जि.बीड) तालुक्यांतर्गत असलेल्या बंधाऱ्यांच्या बांधकामाबाबत

**(१८) ५६९१ (२३-११-२०२०) श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाटोदा (जि.बीड) तालुक्यांतर्गत असलेली दासखेड ३, मेंगडेवाडी १, बेलेवाडी २, बांगरवाडी १ अशी सात बंधारे सदोष असून अतिवृष्टीच्या काळात फुटली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अजून चार बंधारे फुटण्याच्या अवस्थेत असून या बंधाऱ्यांवरील गेटची चोरी झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर कामे करणाऱ्या कंत्राटदारांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शंकरराव गडाख (१८-०८-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे.

सदरील योजना बंधारे नसून तलाव आहेत. सन २०१६ च्या पावसाळ्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे ही कामे क्षतिग्रस्त झाली आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) प्रस्तुत क्षतिग्रस्त झालेल्या तलावांच्या संयुक्त मोजणी अहवालानुसार सदरचे सर्व ७ तलाव अतिवृष्टीमुळे क्षतिग्रस्त झाल्याचे निष्पन्न झालेले आहे. सद्य:स्थितीत क्षतिग्रस्त ७ तलावांपैकी दासखेड पाझर तलाव क्र.२ या तलावाची दुरुस्ती काम पूर्ण करण्यात आलेले आहे. उर्वरित ६ तलावांच्या दुरुस्ती कामांच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजुरी देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## धारूर (जि.बीड) शहरा शेजारील सुप्रसिध्द भुईकोट किल्ल्याच्या भिंती ढासळल्याबाबत

**(१९) ५७०२ (२३-११-२०२०) श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धारूर (जि.बीड) शहराशेजारील सुप्रसिध्द भुईकोट किल्ल्याच्या डागडुजीवर ५ कोटी रुपयांचा खर्च करून तटबंदीच्या भिंती बांधल्या गेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तीन महिन्यापूर्वी बांधण्यात आलेल्या ३ तटबंदी भिंती पावसानंतर ढासळल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने संबंधित गुत्तेदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अमित विलासराव देशमुख (११-०८-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

नोव्हेंबर, २०१६ ते मार्च, २०१७ या कालावधीत बांधण्यात आलेल्या तटबंदीचा काही भाग जोरदार पर्जन्यवृष्टीमुळे कोसळला आहे.

(३) या स्मारकाच्या जतन दुरूस्ती कामाबाबत सखोल चौकशी करून वस्तु:स्थितीदर्शक खुलासा सादर करण्याबाबत तसेच या कामाबाबत जबाबदारी निश्चित करण्याबाबत संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालयास दिनांक १०/११/२०२० च्या पत्रान्वये आदेश देण्यात आले आहे.

तथापि, दायित्व कालावधीमध्ये किल्ल्याच्या तटबंदीची पडझड झाल्यामुळे कंत्राटदाराकडून सदर तटभिंतीचे काम विनामोबदला करून घेण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील ग्रामसेवकांच्या विविध प्रलंबित मागण्यांबाबत

**(२०) ५७२१ (१४-१२-२०२०) डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.विक्रम काळे, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामसेवकांच्या विविध प्रलंबित मागण्यांबाबत ग्रामसेवक संघटनांनी शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामसेवकांकडे १३ विभागाच्या १३८ योजनांची कामे दिली जात असल्यामुळे त्यांच्यावर ताण निर्माण होत असून ग्रामविकास विभागाच्या जलदविकास पंचायत सक्षमीकरण आदी बाबींकरीता ग्रामसेवक हा पदवीधर असल्याबाबतचा नियम करण्याबाबत तसेच शासन निर्णयानुसार प्रवास भत्ता देण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (०६-०७-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) ग्रामसेवकाची अर्हता पदवीधर करण्याबाबत तसेच सेवा प्रवेश नियमात बदल करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. शासन निर्णयानुसार प्रवास भत्ता देण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मंठा (जि.जालना) येथील कस्तुरबा गांधी विद्यालय ते मॉर्डन स्कूल येथील कोविड केंद्राकरीता जोड रस्ता तयार करण्याबाबत

**(२१) ५८३० (१३-११-२०२०) श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंठा (जि.जालना) येथील कस्तुरबा गांधी विद्यालय ते मॉर्डन स्कूल येथील कोविड केंद्रासाठी जोड रस्ता नसल्यामुळे कोविड रुग्णांची ने-आण करताना प्रचंड प्रमाणात गैरसोय होत असल्याचे माहे ऑक्टोंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर जोड रस्त्याचे काम त्वरीत करण्याकरीता कोणती उपाययोजना अथवा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (०६-०७-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) मौजे मंठा, ता.मंठा (जि.जालना) येथील कस्तुरबा गांधी विद्यालय व मॉर्डन स्कूल या दोन इमारती कोविडच्या रुग्णांसाठी शासनाने अधिगृहित केल्या आहे.

या दोन इमारतींकडे जाणाऱ्या रस्त्याची लांबी १.४८० कि.मी. आहे सदर रस्ता योजनाबाहय असल्याने शासनाच्या कोणत्याही योजनेतून सदर रस्त्याचे काम घेता येत नाही. सदर रस्ता शासनाच्या प्रचलित नियमानुसार रस्ते विकास आराखड्यामध्ये समाविष्ट करण्यासाठी पुढील कार्यवाही करण्याबाबत जिल्हा परिषदेस कळविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पट्टीवडगाव फाटा ते पट्टीवडगाव (ता.अंबेजोगाई, जि.बीड) रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(२२) ५८५१ (१४-१२-२०२०) श्री.संजय दौंड :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पट्टीवडगाव फाटा ते पट्टीवडगाव (ता.अंबेजोगाई, जि.बीड) हा रस्ता पावसाळयात खड्डे पडल्यामुळे वाहतुकीस अयोग्य झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार उक्त रस्त्याच्या दुरुस्तीचे काम त्वरीत पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच सदर रस्त्यांच्या कामावर किती खर्च अपेक्षित आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (२८-०६-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.

मागील पावसाळ्यात सदर रस्त्याचे काम प्रगतीपथावर असताना या रस्त्यावरून क्षमतेपेक्षा जास्त वजनाची वाहने गेल्यामुळे तीन ते चार ठिकाणी खड्डे पडले होते, तथापि, सदर खड्डे वाहतुकीस अडथळा निर्माण करण्याइतपत मोठे नव्हते.

(२) सदर रस्त्याची दुरूस्ती माहे डिसेंबर, २०२० मध्ये संबंधित कंत्राटदाराकडून करून घेण्यात आलेली आहे. सदर रस्त्याच्या दुरूस्तीची जबाबदारी काम पूर्ण झाल्यापासून पुढील ५ वर्षे संबंधित कंत्राटदाराची असल्यामुळे या कामाच्या दुरूस्तीसाठी वेगळा खर्च/निधी लागणार नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे सांगरुण येथील नदीपात्रावर पादचारी पुलाचे बांधकाम करण्याबाबत

**(२३) ५८८४ (२३-११-२०२०) श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुळा-मुठा नद्यांच्या संगमावर वसलेल्या मौजे सांगरुण (ता.हवेली, जि.पुणे) येथून पुणे जिल्हा परिषदेमार्फत मौजे सोनापूर मार्गे पानशेत धरण (पर्यटन स्थळ) क्षेत्राकडे जाण्या-येण्यासाठी तेथील ग्रामस्थ व नागरिकांच्या सोईसाठी नदीपात्रातून नावेची (होडी) सुविधा करण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हा परिषदेने सदर नावेची सुविधा गेल्या चार वर्षापासून बंद केल्यामुळे मुळा-मुठा नदीच्या अलिकडील व पलिकडील ग्रामस्थ व अन्य नागरिकांना पानशेतकडे जाण्या-येण्यासाठी खडकवासला मार्गे एसटी बसने किंवा पायी प्रवास करावा लागत असल्याने त्यांना आवश्यक ती सुविधा देण्यात यावी अशा आशयाचे निवेदन दिनांक १४ मार्च, २०२० रोजी वा त्यासुमारास दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मौजे सांगरुण ते मौजे सोनापूर या दरम्यानच्या नदीपात्रावर दोन्ही बाजूंनी तारेच्या कुंपनाने झाकलेला कायमस्वरुपी पादचारी पुल बांधण्यात यावा अशी मागणी तेथील ग्रामस्थ व नागरिकांनी मा.ग्रामविकास मंत्री, प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, पुणे व गटविकास अधिकारी, पंचायत समिती, हवेली, जि.पुणे यांचेकडे दिनांक ३ व ७ सप्टेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाव्दारे पुन्हा मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१२-०७-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) याबाबत कोणतेही निवेदन प्राप्त झाल्याचे निदर्शनास आले नाही.
(४) मौजे सांगरुण व मौजे सोनापूर ही गावे खडकवासला धरणाच्या बुडीत क्षेत्रालगत वसलेली आहेत. दोन्ही गावांच्या मध्ये जलाशय असून जलाशयामधून सरळ अंतर १.०० कि.मी. आहे. सदर गावांना जोडण्यासाठी जिल्हा परिषदेमार्फत ग्रामपंचायत सोनापूर व सांगरुण यांना होड्या पुरविण्यात आलेल्या आहेत. तथापि, कुशल ऑपरेटर नसल्याने सदर होड्या बंद आहेत.

सोनापूर व सांगरुण गावांना जलाशयातून सरळ जोडण्यासाठी पूल बांधावयाचा झाल्यास अंदाजे रुपये ६०.०० कोटी व दोन पदरी पूल बांधकामासाठी अंदाजे रुपये १५०.०० कोटी खर्च अपेक्षित आहे. जिल्हा परिषदेकडे एवढया मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध होऊ शकत नाही.

सदर स्थळापासून मौजे सांगरुण व सोनापूर गावांना जोडण्यासाठी अपस्ट्रीम बाजूस ६.०० कि.मी. अंतरावर व डाऊनस्ट्रीम बाजूस १०.०० कि.मी. अंतरावर वाहतुकीसाठी चांगले डांबरी पर्यायी रस्ते उपलब्ध आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## श्री क्षेत्र नारायणगड देवस्थान, बीड तीर्थक्षेत्र विकास कामांच्या निधीबाबत

**(२४) ६०५१ (०१-१२-२०२०) श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्री क्षेत्र नारायणगड देवस्थान, बीड येथे राज्यभरातून भाविकभक्त मोठ्या संख्येने येत असून या ठिकाणी रुपये २५ कोटी निधीची विकास कामे करण्यात येणार होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुपये २५ कोटी निधीपैकी जवळपास ३ कोटी रुपयांचा निधी देवस्थानाच्या विकासासाठी उपलब्ध होऊ शकला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच उर्वरित निधी कधीपर्यंत उपलब्ध करुन देण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (२१-०६-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे. श्री क्षेत्र नारायणगड देवस्थान, बीड या तीर्थक्षेत्रास ग्रामविकास विभाग, शासन निर्णय, क्र.तीर्थवि-२०१७/प्र.क्र.१७३/योजना-६, दिनांक १४/०२/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये रुपये २५.०० कोटीच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून रुपये २.०० कोटी इतका निधी जिल्हाधिकारी, बीड यांना वितरित करण्यात आला आहे.
(३) जिल्हाधिकारी, बीड यांनी वितरित केलेल्या निधीचे खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र व काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र विभागाकडे अद्‌याप सादर केलेले नाही. त्यामुळे उर्वरित निधी उपलब्ध करून देता आला नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बीड शहरातून वाहणाऱ्या बिंदूसरा नदीवर पुल कम बंधारा बांधण्याबाबत

**(२५) ६०५२ (१४-१२-२०२०) श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बीड शहरातून वाहणाऱ्या बिंदूसरा नदीवर सोमेश्वर मंदिराजवळ पूल कम बंधारा बांधण्याबाबत शहरातील विविध संघटना, नागरिकांकडून सातत्याने मागणी होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याबाबतचा प्रस्ताव नगरपरिषद व संबंधित प्रशासनाने बनवला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन सदर पूल कम बंधारा बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (२४-०६-२०२१) :** (१) हे खरे आहे.

(२) या कार्यालयाशी संबंधित नाही.

(३) बीड शहरातून वाहणाऱ्या बिंदुसरा नदीवर सोमेश्वर मंदीराजवळ पुल कम बंधारा बांधणेच्या कामाचे अंदाजपत्रक नगरपरिषदेला सादर करण्यात आले होते. त्यास नगरपरिषद बीड मार्फत निधी उपलब्ध होणे आवश्यक आहे. त्यानंतर मा.आ.श्री.संदीप रविंद्र क्षीरसागर यांनी सदर बंधारा बीड शहरातून वाहणाऱ्या बिंदुसरा नदीवर औरंगाबाद सोलापुर मार्गावरील नविन IRB पुलाचे निम्न बाजूस उत्तरेकडे अंदाजे ५०० मी. अंतरावर बांधणेबाबत केलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने सादर करण्यात आलेला प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौजे भांडेवाडी (ता.खटाव, जि.सातारा) येथील अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याबाबत

**(२६) ६१११ (०१-१२-२०२०) श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे भांडेवाडी (ता.खटाव, जि.सातारा) येथील जमीन गट क्रमांक ४२९ मधील गट क्रमांक ४०९ मध्ये ग्रामस्थांना जाण्या-येण्यासाठी रस्ता असून सदर रस्ता शासकीय अभिलेखानुसार गट ग्रामपंचायत भांडेवाडी यांच्या नावे असल्याची नोंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गट क्रमांक ४०९ मधील रस्त्याच्या जागेत ग्रामस्थाने अनधिकृत घराचे बांधकाम केल्यामुळे हा रस्ता ग्रामस्थांना गेल्या वर्षापासून बंद करण्यात आला असल्याचे माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामपंचायतीच्या नावे असलेल्या रस्त्यावरील अतिक्रमण काढण्यासाठी ग्रामपंचायतीने व तहसिलदार, खटाव, गटविकास अधिकारी वर्ग-१, पंचायत समिती, खटाव (वडूज) यांनी माजी मंत्री महोदयांशी अनेकदा संपर्क साधून व पत्रव्यवहार करुन सदरचे अतिक्रमण निष्कासित केले

नसल्याचे दिनांक १९ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (२९-०७-२०२१) :** (१) हे खरे नाही.

जमीन गट नं. ४२९ मधील गट क्र. ४०९ मध्ये येण्या-जाण्यासाठी च्या रस्त्याची नोंद शासकीय अभिलेखात नाही.

(२) हे खरे नाही.

गट क्र. ४०९ मधील भांडेवाडी गावातील १४७ लोकांनी सन १९४० पासून घरांची बांधकामे केलेली आहेत. ग्रामविकास विभाग, शासन निर्णय, क्र.प्रआयो-२०१७/प्र.क्र.३४८/योजना-१०, दिनांक १६/०२/२०१८ नुसार सदर बांधकामे नियमाकुल करणेसाठी ग्रामपंचायत भांडेवाडीने दिनांक १८/०६/२०१९ रोजी प्रस्ताव जिल्हाधिकारी सातारा, प्रांत अधिकारी दहिवडी यांचेकडे सादर केलेला आहे.

(३) हे खरे आहे.

ग्रामपंचायत भांडेवाडीने दिनांक १८/०६/२०१९ रोजी सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने संबंधित स्तरावर कार्यवाही सुरु आहे. सदर बांधकामे नियमाकुल करण्याचे कामकाज झाल्यानंतर असणारी अतिक्रमणे निष्कासित करणे उचित ठरणार असल्याने सदर कार्यवाहीस विलंब होत आहे.

(४) सदर अतिक्रमणे निष्कासित करणेच्या अनुषंगाने कार्यवाही करणेची दक्षता ग्रामपंचायत भांडेवाडी घेत आहे.

(५) सदर बांधकामे नियमाकुल करण्याचे कामकाज झाल्यानंतर असणारी अतिक्रमणे निष्कासित करणे उचित ठरणार असल्याने सदर कार्यवाहीस विलंब होत आहे.

---

## मौजे पातेपिलवली तर्फे वेळंब (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील बौध्दवाडी व विठ्ठलवाडी येथून वाहणाऱ्या नदीपात्रातील गाळ उपसून बंधारा बांधण्याबाबत

**(२७) ६१११९ (१४-१२-२०२०) डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पातेपिलवली तर्फे वेळंब (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील बौध्दवाडी व विठ्ठलवाडी येथून वाहणाऱ्या नदीपात्रातील गाळ उपसून बंधारा बांधण्याबाबतची मागणी बौध्दजन विकास संस्था मौजे पातेपिलवली, मुंबई यांनी दिनांक २१ ऑक्टोबर, २०२० रोजी सरपंच/ग्रामसेवक, पातेपिलवली तर्फे वेळंब यांचेकडे तसेच दिनांक २२ ऑक्टोबर, २०२० रोजी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, चिपळूण कार्यालय यांचेकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बौध्दवाडी आणि विठ्ठलवाडी येथून वाहणाऱ्या नदीचे पात्र लहान असल्यामुळे मुबलक पाणी साठा होत नसल्याने ग्रामस्थांना माहे जानेवारी ते जून या कालावधीत पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे, नदीपात्रात आवश्यक पाणी साठा होत नसल्याने ग्रामस्थांना पिण्याचे पाणी व गुरांकरीता पाणी मिळत नसल्याने ग्रामस्थांची अत्यंत गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने ग्रामस्थांच्या पाणीटंचाईची समस्या दूर करण्याच्यादृष्टीने बौध्दवाडी व विठ्ठलवाडी येथून वाहणाऱ्या नदीपात्रातील गाळ उपसून बंधारा बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (१५-०७-२०२१) :** (१) नाही.

तथापि, बौध्दजन विकास संस्था, मौजे पातेपिलवली, मुंबई यांनी सरपंच/ग्रामसेवक, पातेपिलवली तर्फे वेळंब यांचेकडे दिनांक १७/१२/२०२० रोजी मागणी केल्याचे पत्र ग्रामपंचायतीकडे प्राप्त झालेले आहे.

(२) बौध्दवाडी आणि विठ्ठलवाडी येथून वाहणाऱ्या नदीच्या पात्राची रुंदी ही सरासरी २० मी. इतकी असून सद्य:स्थितीत नदीपात्रामध्ये पाण्याचा साठा आहे. या पाण्याचा उपयोग गुरांना पिण्यासाठी केला जातो. बौध्दवाडी आणि विठ्ठलवाडी येथे असणाऱ्या सार्वजनिक विहिर व खाजगी विहिरीत सद्य:स्थितीत पिण्याच्या पाण्याचा पुरेसा साठा आहे. त्यामुळे गैरसोय होत आहे, हे खरे नाही.

(३) सद्य:स्थितीत बौध्दवाडी व विठ्ठलवाडी येथे पाण्याची टंचाई नाही. तथापि, ग्रामस्थांची नदीतील गाळ काढून बंधारा बांधण्याची मागणी आहे. सदर स्थळ पाहाणी करुन व प्राथमिक सर्वेक्षण करून अहवाल देण्यास क्षेत्रियस्तरावर सूचना दिल्या आहेत. प्राप्त अहवालानुसार नदीपात्रातील गाळ उपसणेबाबत व त्याठिकाणी नवीन बंधारा बांधणेबाबत प्रचलित नियमांचे अधिन राहून कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच विठ्ठलवाडी येथील नवीन विहिरीजवळ बंधारा बांधणेचे काम करावयाचे झाल्यास निधी उपलब्धतेनुसार जिल्हा परिषदेमार्फत करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## लॉकडाऊन काळात स्वस्त धान्य दुकाने सुरु ठेवण्याबाबत

**(२८) ६१७३ (१३-१२-२०२०) श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लॉकडाऊन काळात स्वस्त धान्य दुकाने ८ तास सुरु ठेवण्याचे आदेश असूनही अहमदनगर जिल्ह्यात अनेक ठिकाणी स्वस्त धान्य दुकाने २ ते ३ तासच सुरु ठेवली जात असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दुकान चालकांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ (०२-०७-२०२१) :** (१) हे खरे नाही. अहमदनगर जिल्हयात लॉकडाऊनच्या काळात स्वस्त धान्य दुकाने वितरणाकरीता पूर्ण वेळ उघडी ठेवण्याची दक्षता घेण्यात आली आहे.

(२) स्वस्त धान्य दुकानांबाबत लेखी, तोंडी किंवा अन्य प्रकारे तक्रार प्राप्त झाल्यास तात्काळ कारवाई करण्यात आली आहे. तपासणी दरम्यान दोषी आढळून आलेली ११ रास्त भाव दुकाने रद्द करण्यात आली असून २ दुकाने निलंबित करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे, १२ दुकानदारांना सक्त ताकीद देण्यात आली आहे. तसेच, रुपये २७,०००/- एवढी दंड वसूली करण्यात येऊन रुपये ७,९५,४४३/- एवढ्या रकमेचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ३० व्यक्तींवर गुन्हे दाखल करण्यात आले असून २६ जणांना अटक करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्हयातील ग्रामीण रुग्णालयांमध्ये कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याबाबत

**(२९) ६२१६ (२३-११-२०२०) श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.गिरीशचंद्र व्यास, डॉ.परिणय फुके** : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील ग्रामीण रुग्णालयांमध्ये ४६२ कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोविड-१९ च्या रुग्णांची संख्या वाढत असून ग्रामीण रुग्णालयातील रिक्त पदांमुळे त्याचा ताण तेथे कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांवर पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने चंद्रपूर जिल्हयातील ग्रामीण रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत तसेच रुग्णांना मूलभूत सोयी सुविधा पुरविण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे (२६-०७-२०२१) :** (१) हे खरे नाही.

चंद्रपूर जिल्ह्यातील ग्रामीण रुग्णालयामध्ये गट क व ड संवर्गातील ४५२ मंजूर पदांपैकी २७५ पदे भरलेली असून सप्टेंबर, २०२० च्या दरम्यान १७७ पदे रिक्त होती.

(२) हे खरे नाही.

(३) मा.मंत्रिमंडळाच्या मान्यतेने ५० टक्के पदांकरीता दिनांक २८/०२/२०२१ रोजी पदभरती परीक्षा घेण्यात आली असून उमेदवारांना नियुक्तीही देण्यात आली आहे. उर्वरित रिक्त पदे १०० टक्के भरण्यास मा.मंत्रिमंडळाची मान्यता मिळाली असून त्यानुसार पदभरतीची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत आय.पी.एच.एस. च्या निकषाप्रमाणे कंत्राटी तत्वावर विशेषज्ञांची सेवा उपलब्ध करून देण्यात येत आहे.

कंत्राटी तत्वाव्दारे मानधनावर रुग्णसेवेशी संबंधित वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची २०२ पदे भरून कोविड केअर सेंटरवर रुग्ण सेवा प्रदान करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील विविध क्षेत्रातील उल्लेखनिय कामगिरी करणाऱ्या व्यक्तीव संस्थांना पुरस्कार प्रदान करण्याबाबत

**(३०) ६५९४ (१५-०३-२०२१) श्री.अनिकेत तटकरे, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अरुणकाका जगताप, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.संजय दौंड :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या कामगार विभागांतर्गत महाराष्ट्र शासनाच्या कामगार कल्याण मंडळातर्फे दरवर्षी खाजगी क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांना गुणवंत कामगार या पुरस्काराने गौरविण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दरवर्षी कामगार कल्याण मंडळाच्यावतीने राज्यस्तरावर आदर्श कामगार पुरस्कार, कामगार भूषण पुरस्कार, रावबहादूर मेघाजी लोखंडे मित्र पुरस्कार इत्यादी पुरस्कार प्रदान केले जातात तसेच दरवर्षीच्या नोव्हेंबर महिन्याच्या सुमारास पुरस्कारासाठी प्रस्ताव मागविले जातात व फेब्रुवारी-मार्च

महिन्यात या पुरस्काराचे वितरण होते परंतु अद्यापही प्रस्ताव स्वीकारण्यासंदर्भात कोणत्याही सूचना अथवा मार्गदर्शक तत्वे शासनाकडून आलेली नसल्याचे संबंधित कामगार कल्याण अधिकारी यांचेकडून सांगण्यात आल्याचे दिनांक २१ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर पुरस्कार वितरणासंबंधी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (१९-०७-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) मार्च, २०२० मध्ये कोविड-१९ च्या संसर्गामुळे टाळेबंदी लागू करण्यात आल्याने सन २०२०-२१ या वर्षाची गुणवंत कामगार पुरस्कार प्रक्रिया राबविण्यात आली नाही.

(३) सन २०१५-२०१६ आणि सन २०१७-२०१८ हे पुरस्कार दिनांक ०९ फ़ेब्रुवारी, २०२१ रोजी वितरित करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे महान (ता.बार्शी टाकळी, जि.अकोला) येथील पाणलोट क्षेत्रातील पाटबंधारे प्रकल्प बांधकामाबाबत

**(३१) ६८७८ (१५-०३-२०२१) श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे महान (ता.बार्शी टाकळी, जि.अकोला) येथील काटेपुर्णा प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात अकोला व वाशिम जिल्ह्यात पाटबंधारे प्रकल्प बांधण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रकल्प बांधकामाला शासनाची परवानगी प्राप्त झाली आहे काय,

(३) असल्यास, काटेपुर्णा प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात काटेपुर्णा प्रकल्पाच्या साठ्याच्या विहित प्रमाणापेक्षा जास्त साठ्यांचे पाटबंधारे प्रकल्प बांधण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रकल्प प्रस्तावित करण्याची मागणी शासनाकडे करण्यात आली आहे काय,

(५) नसल्यास, प्रस्तावाला मान्यता न देण्याची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (०४-०८-२०२१) :** (१) अंशत: खरे आहे.

काटेपुर्णा प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात वाशिम जिल्हयातील २१ प्रकल्प आहेत. तसेच अकोला जिल्हयात कुठलाही प्रकल्प बांधण्यात आलेला नाही.

(२) होय.

(३) नाही.

उपरोक्त नमूद २१ प्रकल्पांना पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्राप्त करुन प्रकल्पांची कामे करण्यात आली आहेत.

(४) नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील बालविकास प्रकल्प अधिकारी, मुख्यसेविका व अंगणवाडी सेविकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(३२) ८४११ (१०-०६-२०२१) श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोना संसर्गाची लागण लहान मुलांमध्ये होण्याचे प्रमाण वाढत असताना महिला व बालविकास योजनेंतर्गत लहान मुलांसाठी काम करणाऱ्या बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांच्या मंजूर ६२० पदांपैकी २८७ पदे, मुख्यसेविकांच्या मंजूर ३,९०० पदांपैकी १,०१९ पदे व अंगणवाडी सेविकांची हजारो पदे रिक्त असल्याची बाब दिनांक १३ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोनाच्या तिसऱ्या लाटेमध्ये लहान मुलांमध्ये संसर्गाचे प्रमाण वाढण्याचा इशारा वैद्यकीय तज्ञांनी दिला असल्याने राज्यातील महिला व बालविकास योजनेंतर्गत बालविकास प्रकल्प अधिकारी, मुख्यसेविका व अंगणवाडी सेविकांची रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (२३-०८-२०२१) :** (१) हे अंशत: खरे आहे
(२) बालविकास प्रकल्प अधिकारी यांची रिक्त पदे भरण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे. एकात्मिक बालविकास सेवा योजनेतील नागरी प्रकल्पातील मुख्यसेविकांची रिक्त पदे आयुक्त, एकात्मिक बालविकास सेवा योजना, नवी मुंबई यांच्यामार्फत तर ग्रामीण प्रकल्पातील पर्यवेक्षिकांची रिक्त पदे ग्रामविकास विभागाकडून भरण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच अंगणवाडी कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याच्या अनुषंगाने शासन पत्र दिनांक १२/०५/२०२१ अन्वये परवानगी देण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वसई (जि.पालघर) तालुक्याच्या ग्रामीण भागातील पाणीपुरवठा योजना सुरु करण्याबाबत

**(३३) ८४२० (२०-०७-२०२१) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई (जि.पालघर) तालुक्याच्या ग्रामीण भागातील ६९ गावांसाठी रुपये ८५ कोटी अंदाजित खर्चाच्या पाणीपुरवठा योजनेस शासनाने सन २००५ मध्ये मंजूरी दिल्यानंतर सदरहू योजनेचे दायित्व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे सोपविल्यानंतर प्राधिकरणाने सन २००८ मध्ये तत्कालीन मा.जलसंपदा मंत्री यांच्या शुभहस्ते भूमीपूजन करुन योजनेचे काम सुरू केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, १३ वर्षे होवूनही सदरहू योजना अर्धवट अवस्थेत विनावापर असल्यामुळे रुपये ८५ कोटी खर्चाची पाणीपुरवठा योजना रुपये १२७ कोटींवर गेली तसेच, सन २००८ मध्ये सदरहू योजनेच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात

झाल्यानंतर अनेक ठिकाणच्या जलवाहिन्यांचे काम बंद पडून जलवाहिन्या गंजल्या असून पाणी उपलब्धतेसाठीचे जलकुंभही निरुपयोगी ठरले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरण मा.उच्च न्यायालयात गेल्यानंतर शासनाने दिनांक १२ जून, २०१३ रोजी रुपये १०० कोटींचा निधी उपलब्ध करुन दिला परंतु, योजनेचा भांडवली खर्च रुपये १२७ कोटींच्यावर गेल्याने योजनेच्या कामाला गती मिळू शकली नाही, तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी सदर योजना सन २०१९ पर्यंत कार्यान्वित होईल असे मा.उच्च न्यायालयात स्पष्ट केल्यानंतर २ वर्षे होवूनही योजनेचे काम सुरु झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गावातील पाणीपुरवठा योजना मार्गी लावून योजनेचे काम विनाविलंब सुरु करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील (०३-०९-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) अंशत: खरे आहे.

योजनेतील वितरण व्यवस्था व मुख्य जलवाहिन्या जोडून ७ ते ८ वर्षाचा कालावधी झालेला आहे. या कालावधीत वसई-विरार महानगरपालिकेचे विविध कामामुळे पी.व्ही.सी. प्रकारच्या पाईपच्या वितरण व्यवस्थेची व मुख्य जलवाहिन्यांची अनेक ठिकाणी तुटफुट नासधूस झाली आहे. जलकुंभाच्या जलदाबाच्या चाचण्या घेण्यात आल्या असून सदर जलकुंभ सुस्थितीत आहे. सदर योजनेतील ६९ गावापैकी २८ गावांना पाणीपुरवठा सुरु केला असून महानगरपालिकेकडून उर्वरित गावांना पाणी उपलब्धतेनुसार उर्वरित गुरुत्ववाहिनी कार्यान्वित करून पाणी पुरवठ्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही. मात्र सदर योजनेचे काम मार्च, २०२२ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी, पालघर यांनी दिनांक ०७/०२/२०२० रोजी बैठक घेऊन जिल्हा परिषद, पालघर, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व महानगरपालिका, वसई-विरार यांना विविध सूचना केल्या आहेत. त्यानुषंगाने ६९ गावातील जलकुभांपर्यंतच्या गुरुत्ववाहिनी कार्यान्वित

करण्याचे काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने सुरु केलेले आहे. आतापर्यंत ५१ गावांच्या जलकुंभाच्या जोडण्या पूर्ण झालेल्या आहेत. त्यापैकी २८ गावांना पाणीपुरवठा सुरु आहे. सदर योजनेंतर्गत उपांगाकरीता जागा व रेल्वे क्रासिंगची परवानगी उशीराने प्राप्त होणे, एमएमआरडीएच्या रस्ता रुंदीकरणाच्या कामाच्या वेळेस जलवाहिन्यांचे झालेले नुकसान तसेच योजनेकरीता विविध उद्भवावर आधारित जलजोडण्या वसई-विरार महानगरपालिकेकडून उशीराने प्राप्त झाल्याने प्रकल्प कार्यान्वित करण्यास उशीर झालेला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोकणात काजू बियांना योग्य तो हमी भाव प्राप्त होवून काजू प्रक्रिया उद्योग व काजू बोर्ड निर्माण करण्याबाबत

**(३४) ८४३५ (१७-०६-२०२१) श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोकणातील सिंधुदुर्ग व रत्नागिरी या जिल्ह्यांसह कोल्हापूर जिल्ह्यातही मोठ्या प्रमाणात काजूच्या पिकांचे उत्पादन घेण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, काजूवर प्रक्रिया करण्यासाठी काजू उत्पादक क्षेत्रात छोटे-छोटे काजू प्रक्रिया उद्योग नसल्यामुळे काजू उत्पादक शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कोकणातील काजू बियांना हंगामात योग्य हमी भाव मिळत नसल्याने काजू बियांना हमी भाव मिळावा आणि राज्यात काजूबोर्ड निर्माण करावे अशी मागणी काजू उत्पादक शेतकऱ्यांकडून होऊ लागली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने काजू बियांना योग्य तो हमी भाव मिळावा, काजू प्रक्रिया उद्योगांना चालना मिळावी आणि राज्यात काजू बोर्ड निर्माण करावे याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (०२-०९-२०२१) :** (१) होय.

सिंधुदुर्ग, रत्नागिरी तसेच कोल्हापूर जिल्ह्यातील विशेषत: चंदगड, आजरा, गडहिंग्लज या तालुक्यामध्ये शेतकऱ्यांकडून काजू पिकांचे उत्पादन घेतले जाते.

(२) हे अंशत खरे आहे.

रत्नागिरी, सिंधुदुर्ग व कोल्हापूर येथील २२ सहकारी काजू प्रक्रिया संस्थांना भाग भांडवल देवून राष्ट्रीय सहकारी विकास निगम मार्फत कर्ज उपलब्ध करून देण्यात आले आहे. वन्यप्राण्याव्दारे होणारे नुकसान, अपुरे मनुष्यबळ व वाढता खर्च, वातावरणातील बदल (अवकाळी पाऊस, वादळ, वाढते तापमान) तर सध्या कोरोना महामारीमुळे उद्योग धंदे बंद असल्याने शेतकरी अडचणीत सापडले आहेत. तसेच काजूबी काढणी हंगामाच्यावेळी बाजारात काजूबीचे दर कमी राहत असल्याने शेतकऱ्यांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी तसेच शेतकऱ्यांची आर्थिक निकड पूर्ण होऊन पुढील काळात वाढीव बाजार भावाचा त्यांना लाभ व्हावा यासाठी महाराष्ट्र कृषी पणन मंडळामार्फत सन १९९० पासून शेतमाल तारण कर्ज योजना राबविण्यात येत आहे.

(३) व (४) हे अंशत: खरे आहे.

रत्नागिरी जिल्ह्यात काजू बोर्ड निर्माण करावे अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे. काजू बोर्ड निर्माण झाल्यास काजू बियांना योग्य हमी भाव मिळेल असे शेतकऱ्यांना वाटते. परंतु, कोणत्या पिकांना हमी भाव दयावा याबाबत निर्णय केंद्र शासनामार्फत घेतला जातो. तसेच हमी भाव देखील केंद्र शासनाकडून घोषित केले जातात. त्यामुळे ही बाब केंद्र शासनाशी संबंधित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नवी मुंबई येथील तुर्भे एमआयडीसीमधील बालाजी पेंट्स कंपनीला आग लागल्याबाबत

**(३५) ८४७६ (१७-०६-२०२१) श्री.विलास पोतनीस, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई येथील तुर्भे एमआयडीसीमधील “बालाजी पेंट्स” या रंग बनविणाऱ्या कंपनीला दिनांक २ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास लागलेल्या आगीत एका कामगाराचा होरपळून मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपनीला आग लागण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषींवर कारवाई करुन मृत कामगाराच्या नातेवाईकांना कोणती आर्थिक मदत केली तसेच, एमआयडीसी परिसरातील कंपन्यांमध्ये वारंवार घडत असलेल्या आगीच्या घटनांना आळा घालण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हसन मुश्रीफ (०६-०८-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

मे.बालाजी पॉलिकोटस्, एमआयडीसी तुर्भे, जि.ठाणे या कारखान्यात दिनांक ०२/०५/२०२१ रोजी आग लागून श्री.सत्यम प्रेमसिंग राठोड (शिपाई), या कामगाराचा मृत्यू झाला आहे.

(२) सदर कारखान्यात इंन्क, कोटींग्स, वारनिंश इ. बनविण्याची प्रक्रिया केली जाते. दिनांक ०२/०५/२०२१ रोजी कारखान्यातील उत्पादन प्रक्रियेच्या क्षेत्रामध्ये साठवणूक करण्यात आलेल्या सॉलवन्ट ड्रम्सला झाकण न लावल्यामुळे तेथे ज्वलनशील वाफा जमा झाल्याने “वेपर क्लाउड” तयार झाला. ईलेक्ट्रीक शॉर्टसर्कीटमुळे “वेपर क्लाउडला” आग लागल्याने स्फोट झाला व कारखान्यात आग लागली.

(३) सदर अपघाताची औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयामार्फत चौकशी करण्यात आली असून अपघाताच्या दिवशी ज्वलनशील वाफा होऊ नये याकरीता कोणतीही उपाययोजना केली नसल्याने सदर कारखान्याच्या भोगवटादाराविरूध्द महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ अन्वये मा.मुख्य न्यायदंडाधिकारी, ठाणे यांचे न्यायालयात फौजदारी खटला दाखल करण्यात आला आहे.

तसेच पोलीस स्टेशन, तुर्भे, जि.ठाणे येथे अकस्माक जळीत रजि.नं. ०८/२०२१ नोंद करण्यात आली आहे.

मृत कामगार ईएसआयसी अंतर्गत नोंदणीकृत असल्याने मृत कामगाराच्या वारसास ईएसआयसीमार्फत दरमहा पेन्शन मिळणार असून कारखान्याच्या भोगवटादाराने मृत कामगाराच्या वारसास रुपये २.०० लक्ष इतके सानुग्रह अनुदान देण्याचे मान्य केले आहे.

औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयामार्फत करण्यात आलेल्या उपाययोजना :-

१. महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था, मुंबई व नागपूर येथे औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाच्या पुढाकाराने रासायनिक कारखान्यांमधील सुरक्षिततेकरीता प्रशिक्षण वर्गाच्या माध्यमातून आतापर्यंत १००० पेक्षा जास्त कामगारांना प्रशिक्षित करण्यात आले आहे.

२. अपघात परिस्थितीमध्ये जिवीत व वित्तहानी टाळण्याकरीता सन २०२० मध्ये २५८ कारखान्यांमध्ये आपत्कालीन आराखड्याची रंगीत तालीम (Mock Drill) करुन घेतल्या आहेत.

३. औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय व परस्पर सहाय्यता गट (MARG) यांच्या सहाय्याने औद्योगिक परिसरातील कामगारांमध्ये सुरक्षिततेची जाणीव वृध्दींगत करण्याकरीता वेळोवेळी प्रशिक्षण वर्गांचे आयोजन केले जाते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात अंगणवाडी सेविका मानधनापासून वंचित असल्याबाबत

**(३६) ८४८२ (१०-०६-२०२१) श्री.जयंत पाटील, श्री.बाळाराम पाटील, डॉ.सुधीर तांबे, श्री.किशोर दराडे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.नागोराव गाणार, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रवीण दटके, श्री.रामदास आंबटकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ठाणे व पालघर जिल्ह्यातील वाढता कोरोना प्रादुर्भाव यावर नियंत्रण आणण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या बरोबरीने अंगणवाडी सेविका व मदतनीस कार्यरत असून त्यांच्यावर घरोघरी जाऊन सर्व्हेक्षण करण्याची जबाबदारी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे व पालघर जिल्ह्यात एकात्मिक बालविकास सेवा योजनेंतर्गत शहरी व ग्रामीण भागात १३५०० अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या माध्यमातून प्रशासनाच्या विविध योजनांचा लाभ गर्भवती व स्तनदा मातांसह शून्य ते सहा वयोगटातील बालकांना पोषण आहार देणे आदी कामे करण्यापासून ते कोरोना प्रादुर्भाव वाढू नये यासाठी पालिका व गावागावात सर्दी-खोकला-ताप असलेल्या व्यक्तींचा सर्व्हे करण्याची जबाबदारी देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात एकात्मिक बालविकास योजनेंतर्गत २ लाख अंगणवाडी महिला कर्मचारी कार्यरत असून गेल्या दोन महिन्यांपासून (मार्च ते मे पर्यंत) मानधनाच्या प्रतिक्षेत असल्याने त्यांची उपासमार सुरू असल्याची बाब माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी संघाच्यावतीने मा.मुख्यमंत्री व एकात्मिक बालविकास सेवा योजना आयुक्तांना मागण्यांचे निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्यातील ५३३ पैकी ४२५ प्रकल्प हे ग्रामीण व आदिवासी विभागात कार्यरत असून त्यात गरीब, विधवा व परित्यक्त्या महिलांचा समावेश असून अंगणवाडीत काम करणाऱ्या महिलांना कोविड-१९ अंतर्गत सुरू असलेल्या (लॉकडाऊन) टाळेबंदीच्या काळात मोठ्या आर्थिक समस्या निर्माण झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सदर अंगणवाडी महिला कर्मचाऱ्यांचे मागील दोन महिन्यांचे मानधन देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) (२९-०७-२०२१) :** (१) व (२) ठाणे जिल्ह्यातील अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना नियमित कामाव्यतिरिक्त वाढता कोरोना प्रादुर्भाव यावर नियंत्रण आणण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या बरोबरीने घरोघरी जाऊन सर्व्हेक्षण करण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. तथापि, पालघर जिल्ह्यातील केवळ तलासरी तालुक्यातील अंगणवाडी सेविकांना अशी जबाबदारी यावर्षी देण्यात आली आहे.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे आहे.

(५) व (६) एकात्मिक बालविकास सेवा योजनेमधील राज्यातील ४४९ ग्रामीण व आदिवासी तसेच १०४ नागरी अशा एकूण ५५३ प्रकल्पामधील कार्यरत अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे माहे जून, २०२१ पर्यंतचे मानधन केंद्र शासनाच्या PFMS प्रणालीव्दारे अदा करण्यात आले आहे.

---

## कल्याण येथील वालधुनी व उल्हास नदीचे प्रदूषण रोखण्याबाबत

**(३७) ८५२० (१५-०६-२०२१) डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवलीतील दवाखान्यात वापरलेल्या सुया, कापूस, सलाईन आदि जैविक कचरा प्रक्रिया न करताच वाहतूक करुन वालधुनी, उल्हास नदीत टाकल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात कोरोनाचे संकट वाढत असताना अशा प्रकारे जैविक कचरा नदीत टाकला जात असल्याने नागरिकांच्या तसेच जलचर प्राण्यांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला असून नदीत जैविक कचरा टाकल्यामुळे नदी परिसरात प्रदूषण, दुर्गंधी वाढली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नदीचे प्रदूषण रोखण्याबाबत कार्यवाही करुन यास जबाबदार असणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे (१३-०९-२०२१) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर शहरातील अंबाझरी उद्यानात अवैद्यरित्या वृक्षतोड करण्यात आल्याबाबत

**(३८) ८५७२ (११-०६-२०२१) श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, श्री.प्रशांत परिचारक, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील अंबाझरी उद्यानात रात्री अंधारात वृक्षतोड करण्यास सुरुवात झाली असून महानगरपालिकेच्या उद्यान विभागाने उक्त परिसरातील १००० झाडे कापन्याची परवानगी दिली असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरोनाच्या प्रकोपामुळे एकीकडे ऑक्सीजनसाठी रूग्णांच्या नातेवाईकांना करावी लागणारी धावपळ व दुसरीकडे निःशुल्क ऑक्सीजन देणाऱ्या झाडांची कटाई अशी विदारक परिस्थिती असताना देखील शासनाने याबाबत कुठल्याही प्रकारची कारवाई केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०९-०९-२०२१) :** (१), (२), (३) व (४) नागपूर शहरातील अंबाझरी उद्यानाचा ताबा दिनांक ३०/०१/२०१८ पासून महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाकडे असून, महामंडळाकडून सदरचे उद्यान संचालनाकरीता मे.गरुडा अम्युजमेंट पार्क प्रा.लि. या कंपनीला देण्यात आलेले आहे.

मे.गरुडा अम्युजमेंट पार्क प्रा.लि. या कंपनीकडून दिनांक १९/०३/२०२१ रोजी या उद्यानातील वादळी वाऱ्यामुळे उन्मळून पडलेली झाले उचलण्याकरीता नागपूर महानगरपालिकेकडे परवानगी मागितलेली होती. त्यानुसार, नागपूर महानगरपालिकेने वस्तुस्थिती तपासून, उद्यानातील उन्मळून पडलेली २४ व वाळलेली ७४ अशी एकूण ९८ झाडे जमिनीपासून कापण्यास दिनांक ०७/०४/२०२१ रोजी परवानगी दिलेली आहे.

तथापि, प्रत्यक्ष स्थळपहाणीअंती झालेल्या पंचनाम्यानुसार उद्यानाच्या प्रवेशव्दाराच्या बाहेर ११ बाभुळ जातीची झाडे कोणतीही परवानगी न घेता, जमिनीपासून कापण्यात आल्याचे निदर्शनास आल्यानंतर, मे.गरुडा अम्युजमेंट पार्क प्रा.लि. यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली होती. त्यावर प्राप्त उत्तराच्या आधारे, प्रथमदर्शनी महाराष्ट्र शहरी क्षेत्र वृक्ष जतन अधिनियम १९७५ च्या कलम ८ चे उल्लघंन संबंधित कंपनीकडून झाल्याचे निदर्शनास आल्यामुळे, त्यांचेविरोधात कारवाई होण्याच्या दृष्टीने मा.न्यायालयात प्रकरण दाखल करण्यात आल्याचे, नागपूर महानगरपालिकेच्या अहवालात नमूद करण्यात आलेले आहे.

---

## नागपूर शहरात कोरोनाबाधितांची संख्या कमी दाखविण्यात येत असल्याबाबत

**(३९) ८५७५ (१८-०६-२०२१) श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, श्री.प्रशांत परिचारक, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरात २८८ कोरोना बाधितांवर अंत्यसंस्कार करण्यात आले असून नोंदणी केवळ ८९ जणांची झाल्याची बाब निदर्शनात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाकडून जाहीर करण्यात येणारी संख्या व शहरातील दहनघाटावर कोरोना बाधिंतावर करण्यात आलेल्या अंतिम संस्काराची संख्या यात मोठी तफावत दिसून आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपूर शहरात इतक्या मोठ्या प्रमाणात अंतिम संस्कार होत असताना कोरोना बाधितांची संख्या कमी दाखविण्यात येण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०९-०९-२०२१) :** (१) दिनांक २८ एप्रिल, २०२१ च्या दैनिक लोकमत वृत्तपत्रात अशा आशयाची बातमी प्रसिध्द झालेली होती.
(२), (३), (४) व (५) नागपूर शहरातील दहन घाटावर, कोविड, नॉन-कोविड, संशयित (सारी) मुळे मृतक असलेल्या व्यक्तींचे अंतिम संस्कार केले जातात. या मृतकांमध्ये नागपूर शहरातील, ग्रामीण भागातील, दुसऱ्या जिल्हयातील व शेजारील राज्यातील मृतकांचाही समावेश होतो.

एखाद्या व्यक्तीची कोविड टेस्ट केल्यानंतर जर टेस्ट पॉझीटिव्ह आली तर अशा व्यक्तीची लगेच केंद्र शासनाच्या "ICMR" पोर्टलवर संबंधित यंत्रणेकडून नोंद होत असते, काही व्यक्तींच्याबाबतीत अशी नोंद वेळेवर होत नाही.

कोविड बाधित व्यक्ती खाजगी/शासकीय हॉस्पिटलमध्ये अथवा घरीच मृत पावल्यास, अशा मृतकाचे कोविड प्रोटोकॉलनुसार, अंतिम संस्कार तात्काळ करणे आवश्यक असते. त्यावेळी प्रथम मृतदेहावर अंतिम संस्कार केले जातात. तसेच ज्या हॉस्पिटलमध्ये मृत्यू झाला त्या हॉस्पिटलने त्याच दिवशी "ICMR" पोर्टलवर सदर मृत्यूची नोंद घेणे आवश्यक असते. तथापि, कोरोना काळात त्यांच्यावरील अतिरिक्त भाराने या नोंदी काहीशा उशिराने घेतल्या गेल्या आहेत, तथापि, सर्वच नोंदी घेतल्या गेल्या आहेत. या विलंबित नोंदीमुळे दहनघाटावरचे दैनंदिन आकडे व शासनाच्या पोर्टलवरील दैनंदिन आकडे यात फरक जाणवत असला तरी, अंतिमत: "Facility" ॲप व्दारे आकड्यांचा ताळमेळ घातला जातो, ही प्रक्रिया निरंतर चालणारी आहे.

त्यानुसार, दिनांक २६/०४/२०२० रोजी शहरातील दहन घाटावर १७८ आणि शहराबाहेर ४७ तसेच शहरातील कब्रस्थानामध्ये शहरात ०९ आणि शहराबाहेर ०१ अशा कोविडमुळे मृत पावलेल्या २३५ व्यक्तींवर अंतिम संस्कार झाल्याचे आढळून आलेले आहे.

तर, नॉन-कोविड मृतकांपैकी शहरातील दहन घाटावर ११३ व शहराबाहेर ०९ आणि शहरातील कब्रस्थानामध्ये १५ व शहराबाहेर ०१ अशा एकूण १३८ मृतकांवर अंतिम संस्कार झाल्याचे आढळून आले आहे.

---

## नागपूर शहरात कोरोनाने मृत झालेल्या व्यक्तीवर अंत्यसंस्कार करण्यासाठी पैसे घेतल्याबाबत

**(४०) ८५८३ (११-०६-२०२१) श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, श्री.प्रशांत परिचारक, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील मानेवाडा स्मशानभूमीवर कोरोनाने मृत झालेल्या व्यक्तींवर लवकर अंत्यसंस्कार करण्यासाठी प्रत्येक मृत व्यक्ती मागे रूपये १०००/- ते १५००/- घेण्यात येत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पैसे कंत्राटदारांच्या लोकांकडून वसूल केली जात असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०९-०९-२०२१) :** (१) अशा आशयाची बातमी दिनांक २९/०४/२०२१ च्या दैनिक लोकमतमध्ये प्रसिध्द झालेली होती.

(२), (३) व (४) दैनिक लोकमतमध्ये प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने, करण्यात आलेल्या चौकशीअंती असलेली वस्तुस्थिती खालीलप्रमाणे. :-

नागपूर शहरातील एकूण १६ दहनघाटापैकी ०६ ठिकाणी पर्यावरण पूरक दहन मोफत करण्यात येत असून, या ०६ दहनघाटामध्ये मानेवाडा दहनघाटाचा देखील समावेश आहे.

परंतु अशा ठिकाणी पर्यावरण पूरक दहन न करता जर लाकडाव्दारे दहन करण्याकरीता मृतकाच्या नातेवाईकाकडून मागणी करण्यात आली तर, मात्र प्रति शव रुपये २५३०/- इतके शुल्क आकारणी करण्यात येते.

त्यानुसार, मानेवाडा येथील दहनघाटावर दिनांक २८/०४/२०२१ रोजी एका मृतकाचे शव दहन करण्यासाठी आले असता, त्यांच्या नातेवाईक/मित्र परिवाराने, त्यांना पर्यावरण पूरक दहनविधी करावयाचा नसून, लाकडावर

दहन विधी करावयाचा असल्याचे सांगून लाकडांची मागणी केल्यानंतर, तेथील कार्यरत कर्मचाऱ्यांनी नियोजित रुपये २५३०/- इतके शुल्क आकारुन व पावती दिलेली आहे व त्यानंतर रितसरपणे मृतक शवाचे दहन करण्यात आलेले आहे.

असे आयुक्त, नागपूर मनपा यांच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

---

## कोकरूड (ता.शिराळा, जि.सांगली) येथील वारणा नदीवरील कोकरूड-रेठरे बंधाऱ्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(४१) ८६१३ (२२-०६-२०२१) श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिराळा (जि.सांगली) तालुक्याच्या पश्चिम भागातील शिराळा-शाहूवाडी तालुक्यांना जोडणारा कोकरूड येथील वारणा नदीवरील कोकरूड-रेठरे बंधारा धोकादायक स्थितीत असल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बांधाऱ्यावरून वाहनांची वर्दळ असल्यामुळे कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी बंधाऱ्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.जयंत पाटील (०५-०८-२०२१) :** (१) हे खरे नाही.

प्रश्नामध्ये उल्लेख केलेला वारणा नदीवरील कोकरूड-रेठरे असा बंधारा नसून त्यादरम्यान चिंचोली को.प. बंधारा आहे.

सदर चिंचोली को.प. बंधारा हा ५५ वर्षापूर्वी बांधला असल्याने त्यास काही बांधकाम दुरूस्ती आवश्यक आहे.

(२) चिंचोली को.प. बंधाऱ्याची दुरूस्ती सन २०२१-२२ मध्ये पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## धनगर समाजाला कायद्याच्या धर्तीवर आरक्षण मिळण्याबाबत

**(४२) ८६२१ (१५-०६-२०२१) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम, श्री.प्रविण दरेकर, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्री.सुरेश धस, श्री.महादेव जानकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.प्रवीण दटके, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धनगर समाजाला कायद्याच्या धर्तीवर आरक्षण मिळावे याकरीता टाटा सामाजिक विज्ञान संस्था (टीस) यांनी शासनास सादर केलेला अहवाल अभिप्रायाकरीता महाधिवक्ता यांचेकडे पाठविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्याप धनगर समाजाच्या आरक्षणाबाबत निर्णय होण्याच्या अनुषंगाने कोणतेच अभिप्राय प्राप्त झाले नसून सदर विलंबास महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ च्या कलम ११ (ii) व (Vi) नुसार लोकायुक्त तसेच इतर सांविधानिक संस्था व आयोग यांना संदर्भ करण्यात आलेली प्रकरणे तसेच मोठा धोरणात्मक निर्णय समाविष्ठ असलेली प्रकरणे वगळण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रस्तुत प्रकरणी टाटा सामाजिक विज्ञान (टीस) संस्थेने धनगर समाजाच्या अहवालावर महाधिवक्ता यांचे अभिप्राय प्राप्त झाल्यावर पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे काय, तसेच धनगर समाजाच्या हिताच्या मागण्या अन्य विभागांशीही संबंधित असल्यामुळे अभिप्रायाकरीता उक्त अहवाल संबंधित विभागाकडे पाठविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने धनगर समाजाच्या अहवालावर महाधिवक्ता व संबंधित विभाग यांचे अभिप्राय लवकरात लवकर प्राप्त होण्याच्या दृष्टीने शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (०६-०८-२०२१) :** (१) मा.मंत्रिमंडळ उपसमितीच्या दिनांक २ मार्च, २०१९ रोजी झालेल्या बैठकीत देण्यात आलेल्या निर्देशानुसार धनगर समाजाबाबतचा टाटा सामाजिक विज्ञान संस्था, मुंबई यांचा अहवाल महाअधिवक्ता, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे अभिप्रायासाठी पाठविण्यात आलेला आहे.

(२) होय.

(३) व (४) टाटा सामाजिक विज्ञान संस्थेने सादर केलेला अहवाल हा, धनगर समाज अनुसूचित जमातीचे निकष पूर्ण करतो किंवा कसे याबाबत आहे. त्यामुळे सदर अहवालाची प्रत इतर विभागांकडे अभिप्रायासाठी पाठविण्यात आलेली नाही. सदर अहवालावर महाअधिवक्ता यांचे अभिप्राय लवकर प्राप्त व्हावे याद‍ृष्टीने पाठपुरावा करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्याबाबत

**(४३) ८६२४ (०९-०६-२०२१) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ८ मधील प्रश्न क्रमांक ५३७६ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा याकरीता दिनांक १० जानेवारी, २०१२ रोजी वा त्यासुमारास घेण्यात आलेल्या निर्णयान्वये प्रा.रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखाली मराठी भाषा तज्ञ साहित्यिकांची समिती गठीत करण्यात आली असून उक्त समितीने संशोधन करुन मराठी भाषा ही केंद्र शासनाच्या निकषाची पूर्तता करीत असल्याबाबतचा अहवाल राज्य शासनास सादर केलेला असून सदर अहवालाची दिनांक २१ जुलै, २०१३

रोजी वा त्यासुमारास इंग्रजी भाषेमध्ये परिशिष्टासह ग्रंथरुपात छपाई करुन घेण्यात आली असून दिनांक १६ नोव्हेंबर, २०१३ च्या पत्रान्वये मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त व्हावा या उद्देशाने अहवाल केंद्र शासनास सादर केलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याबाबत केंद्र शासनाने निर्णय घेतलेला नसल्यामुळे पुढील कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने उक्त प्रस्तावास केंद्र शासनाची मान्यता मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनामार्फत गत सात वर्षांच्या कालावधीत कशा पध्दतीने पाठपुरावा करण्यात आला वा येत आहे व त्याची फलनि:ष्पती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई (२४-०६-२०२१) :** (१) होय.

(२) होय.

(३) केंद्र शासनाने त्यांच्या दिनांक २०/१०/२०२० च्या पत्रान्वये राज्य शासनाचा प्रस्ताव अन्य मंत्रालये व साहित्य अकादमीच्या भाषा तज्ञ समिती मार्फत विचाराधीन असल्याचे कळविले आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने मा.मुख्यमंत्री, मा.मंत्री, मा.मुख्य सचिव, सचिव यांचेस्तरावर केंद्र शासनाकडे सातत्याने पाठपुरावा/पत्रव्यवहार सुरू आहे.

सद्य:स्थितीत मा.मुख्यमंत्री महोदय यांनी दिनांक ०८/०६/२०२१ रोजी मा.पंतप्रधान महोदयांची प्रत्यक्ष भेट घेऊन मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा लवकरात लवकर देण्याबाबत विनंती केली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीत कोटयवधीचा गैरव्यवहार झाल्याबाबत

**(४४) ८६२५ (०९-०६-२०२१) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आशिया खंडातील सर्वात मोठी कृषी उत्पन्न बाजार समिती असा लौकीक असलेल्या मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीत कंत्राट देताना केलेले भ्रष्टाचार, अनियमितता व नियमबाह्य कामे यामुळे कोटयवधीचा गैरव्यवहार झाला असल्याची बाब माहे, फेब्रुवारी, २०२१ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१५-१६, २०१६-१७ व २०१७-१८ या वर्षातील लेखापरिक्षण अहवाल सादर झालेले नसून सन २०१८-१९ आणि २०१९-२० या वर्षांचे लेखा परिक्षण झालेले नसल्याचेही निदर्शनास आलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने शिखर बाजारपेठ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती गैरव्यवहारात जबाबदार असणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (०२-०९-२०२१) :** (१) दिनांक ०१/०४/२०१३ ते ३१/०३/२०१५ या कालावधीत लेखापरिक्षण अहवालातील मुद्दाबाबत दैनिक सकाळ या वृत्तपत्रात फेब्रुवारी, २०२१ च्या अखेरीस बातम्या प्रसिध्द झाल्या होत्या. सदर लेखापरिक्षण अहवालातील सर्व मुद्दांबाबत विहित नियमाप्रमाणे दोष दुरूस्ती अहवाल देण्यात आलेला आहे.

(२) नाही.

बाजार समितीचे दिनांक ०१/०४/२०१५ ते ३१/०३/२०१८ या कालावधीचे वैधानिक लेखापरिक्षण अहवाल बाजार समितीस दिनांक ३०/०४/२०२१ रोजी प्राप्त झालेले आहे. तसेच सन २०१८-१९ व २०१९-२० या कालावधीचे वैधानिक लेखापरिक्षण दिनांक ०२/०३/२०२१ पासून सुरू करण्यात आलेले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## औरंगाबाद जिल्हयातील पाणीपुरवठा विभागातील भूवैज्ञानिकाची पदे भरण्याबाबत

**(४५) ८६२७ (१५-०६-२०२१) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद जिल्हयात भूवैज्ञानिकाअभावी जिल्हयातील पाणीपुरवठा विभागातील ७८ कामे प्रलंबित असल्याचे माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून पाणीपुरवठा विभागातील तीन मंजूर पदांपैकी एक पद भरण्यात आले तर उर्वरित पदे तात्काळ भरण्याबाबत जिल्हयातून सातत्याने मागणी होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सोयगाव, वैजापूर व गंगापूर तालुक्यातील काही गावांमध्ये तीव्र पाणी टंचाई जाणवत असून गावांचे सर्वेक्षण करण्यासाठी भूवैज्ञानिक अधिकारी नसल्याने प्रस्ताव प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जिल्हयातील पाणीपुरवठा विभागातील रिक्त पदे तात्काळ भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील (०८-०९-२०२१) :** (१) अंशतः खरे आहे.

ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद येथे १ सहायक भूवैज्ञानिक व २ कनिष्ठ भूवैज्ञानिक ही मंजूर पदे आहेत. यापैकी १ कनिष्ठ भूवैज्ञानिक कार्यरत आहे. टंचाई अंतर्गत उपाययोजनांची आवश्यकता विचारात घेऊन १ अधिकाऱ्याची सेवा तात्पुरत्या स्वरुपात उपलब्ध करुन दिल्या आहेत.

(२) अंशतः खरे आहे.

सर्वेक्षण अपेक्षित असणाऱ्या कालावधीनंतर कार्यरत अधिकाऱ्यांकडून आवश्यक उपाययोजनांकरीता सर्वेक्षण करण्यात आले आहे.

(३) जिल्हा परिषद, औरंगाबाद यांचे मागणीनुसार उपसंचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, औरंगाबाद यांनी एक भूवैज्ञानिक तात्पुरत्या स्वरुपात प्रतिनियुक्तीवर सर्वेक्षण कामासाठी उपलब्ध करुन दिला. जिल्हा परिषद, औरंगाबाद स्तरावरुन ३ कंत्राटी भूवैज्ञानिकांची दिनांक ०१/०६/२०२१ पासून नियुक्ती करण्यात आली आहे. सहाय्यक भूवैज्ञानिक, कनिष्ठ भूवैज्ञानिक व वरिष्ठ भूवैज्ञानिक संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शेकटा (ता.जि.औरंगाबाद) येथील मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजनेचे प्रलंबित काम सुरु करण्याबाबत

**(४६) ८६२८ (१५-०६-२०२१) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेकटा (ता.जि.औरंगाबाद) येथील मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजनेंतर्गत मंजूर झालेल्या योजनेचे काम प्रलंबित असल्याचे माहे एप्रिल, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेकटा येथील मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल योजनेंतर्गत एक कोटी सात लाख आठ हजार रुपयांच्या योजनेस माहे जानेवारी, २०१८ मध्ये मंजूरी देण्यात आली असून सदर योजनेचे भूमिपुजन होऊन तीन वर्षाचा कालावधी होवूनही योजना मागील दिड वर्षापासून बंद पडली असल्याने गावात भीषण पाणी टंचाई जाणवत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार गावातील पाणीटंचाई दूर होण्याच्यादृष्टीने सदरहू योजनेचे काम तात्काळ सुरु करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील (०६-०८-२०२१) :** (१) होय.
(२) व (३) अंशत: खरे आहे.

मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत मौ.शेकटा (ता.जि.औरंगाबाद) पाणीपुरवठा योजनेच्या रुपये १०७.०८ लक्ष किंमतीच्या अंदाजपत्रकास दिनांक ०९/०२/२०१८ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे. कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे, रेल्वे क्रॉसिंग व समृध्दी महामार्ग क्रॉसिंगचे काम प्रलंबित राहिले होते.

तथापि, गावातील पाणी टंचाई दूर होण्याच्या दृष्टीने प्रलंबित असलेले रेल्वे क्रॉसिंग व समृध्दी महामार्गाच्या क्रॉसिंगचे काम माहे एप्रिल, २०२१ मध्ये पूर्ण करुन दिनांक २५ मे, २०२१ पासून चाचणी स्वरुपात पाणीपुरवठा सुरु करण्यात आला आहे. त्यामुळे यावर्षी पाणी टंचाई उपाययोजनांची गरज भासली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औरंगाबाद सिडको बसस्थानक येथे बसपोर्ट बांधण्याबाबत

**(४७) ८६३३ (१५-०६-२०२१) श्री.अंबादास दानवे : तारांकित प्रश्न क्रमांक ७८४ ला दिनांक २८ फेब्रुवारी, २०२० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद जिल्ह्यात विमानतळाच्या धर्तीवर सिडको बसस्थानक परिसरात उभारण्यात येणाऱ्या भव्य बसपोर्ट प्रकल्पाचे काम सुरु करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पाकरीता दिनांक २८ ऑगस्ट, २०१८ रोजी तत्कालीन परिवहन मंत्री यांच्या हस्ते भुमिपुजन करण्यात आले असून सदर प्रकल्पाकरीता विकासकाची निवड करण्यात येवून त्यांना दिनांक ०४/०९/२०१९ अन्वये देण्यात आलेल्या स्वीकृतीपत्रानुसार विकासकरार करण्यासाठी बांधकाम परवानगी मिळण्याकरीता विकासकाकडून सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू बसपोर्ट प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच, सदर प्रकल्पाचे काम कधीपर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे,
(४) असल्यास, सदरहू प्रकल्पाचे काम प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत ?

**ॲड. अनिल परब (११-०८-२०२१) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) सदर प्रकल्प उभारणीसाठी सिडकोचे “ना-हरकत प्रमाणपत्र” प्राप्त करण्यासाठी व त्यानुसार औरंगाबाद महानगरपालिका यांचेकडून बांधकामास परवानगी मिळणेसाठी विकासक व राज्य परिवहन महामंडळाकडून पाठपुरावा सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील कुष्ठरुग्णांना देण्यात येणारे मानधन गत नऊ महिन्यांपासून प्रलंबित असल्याबाबत

**(४८) ८७२२ (१३-०७-२०२१) श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **नगरविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकाहद्दीतील कुष्ठरुग्णांना महानगरपालिका प्रशासनातर्फे दरमाह देण्यात येणारे २५०० रुपयांचे मानधन गत नऊ महिन्यापासून मिळाले नसल्याचे माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोरोना काळात मानधन न मिळाल्यामुळे कुष्ठरुग्णांची औषधा अभावी परवड होत असून हनुमान नगरमधील कुष्ठरुग्णांना अदयाप लस सुध्दा देण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कुष्ठरोग रुग्ण माहे सप्टेंबर, २०२० ते आजतागायत मानधनापासून वंचित राहण्यामागची कारणे काय आहेत, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्‌नुसार कुष्ठरुग्णांना तात्काळ मानधन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०६-०८-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेमार्फत कुष्ठरूग्णांवर तसेच कोरोना बाधित रूग्णांवर महानगरपालिकेच्या रूग्णालयात मोफत उपचार केले जातात.

हनुमान नगर कुष्ठरूग्ण वसाहत येथे दर बुधवारी मोफत बाह्यरूग्ण सेवा पुरविण्यात येत असून, त्याकरीता महानगरपालिकेचे वैद्यकीय अधिकारी तसेच शासनाचे कुष्ठरोग विभागाचे वैद्यकीय अधिकारी हे ओपीडीमध्ये रूग्ण तपासणी करून औषधोपचार करतात.

हनुमान नगर कुष्ठरूग्ण वसाहत मधील ६२ कुष्ठरूग्णांचे दिनांक १९/०५/२०२१ रोजी लसीकरण करण्यात आले असून उर्वरित कुष्ठरूग्णांचे लवकरच लसीकरण करण्यात येणार आहे.

(३) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील कुष्ठरूग्णांना महापालिकेमार्फत रुपये २५००/- प्रतिमहा याप्रमाणे त्रैमासिक मानधन अदा करण्यात येते.

संबंधित लाभार्थ्यांचे हयातीचे व अपंगत्व प्रमाणपत्र पडताळणी करणेकरीता वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली आहे.

कोविड कालावधीत कोविड रूग्णांवर उपचार व इतर प्रशासकीय कामामुळे प्रमाणपत्र पडताळणी व मानधन अदा करण्यास विलंब झाला, ही वस्तुस्थिती आहे.

सदर बाबींची पुर्तता करून सर्व संबंधित लाभार्थ्यांना दिनांक ११/०५/२०२१ रोजी प्रलंबित ०९ महिन्यांचे मानधन अदा करण्यात आले असल्याचे, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई-गोवा महामार्गावरील रासायनिक घनकचरा वाहतुकीबाबत

**(४९) ४२०७९ (०१-०८-२०१८) श्री.जयंत पाटील, श्री.बाळाराम पाटील, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा महामार्गावरून खेड, चिपळूण, महाड औद्योगिक क्षेत्रातील ओला घनकचरा वाहतूक करताना महाराष्ट्र प्रदूषण मंडळाचे आणि वाहतूक विभागाच्या नियमाचे पालन न करता वाहतूक केली जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर औद्योगिक क्षेत्रातील रासायनिक ओला घनकचरा रस्त्यावर सांडत जाणाऱ्या कंपन्यांच्या वाहनांवर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे कोणतेच नियंत्रण नसल्याचे दिसून येते, अनेकदा हा घनकचरा ओला असल्याने त्या मधून रासायनिक घनकचरा आणि पाणी रस्त्यावर सांडते तसेच मागील बाजूस उडत असल्याने दुचाकीस्वारांसह प्रवाश्यांना याचा त्रास सहन करावा लागत असून औद्योगिक क्षेत्रातील रासायनिक घनकचरा हा संबंधित कंपन्यांनी कंपनीच्या आवारात वाळवून मगच मुंबई वेस्ट मॅनेजमेंट सारख्या प्रकल्पांना नष्ट करण्यासाठी देणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबई-गोवा महामार्गावर अनेकदा ओला घनकचरा रस्त्याच्या कडेला व नदीत टाकून देण्याच्या घटना घडल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, संबंधित दोषी कंपन्यांवर व वाहतूक करणाऱ्यांवर शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.आदित्य ठाकरे (०६-०९-२०२१) :** (१) हे खरे नाही.
(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औरंगाबाद एकात्मिक आदिवासी विकास केंद्रामार्फत लाभार्थ्यांची फसवणूक होत असल्याबाबत

**(५०) ४३९५५ (०४-०४-२०१९) श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद एकात्मिक आदिवासी विकास केंद्रामार्फत एचडी पाईप, सायकल, थ्रेशर, शिलाई मशीन, कृषी अवजारांचे लाभार्थ्यांना वाटप झाले नसल्याचे व त्याबाबतचे नोंदणीही ठेवण्यात आले नसल्याची बाब माहे जुलै, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणामध्ये शासनाची सुमारे ६० लाखांची फसवणूक झाल्याचे निदर्शनास आले असून प्रकल्प अधिकारी व कर्मचाऱ्यांनी फसवणूक केल्याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषी आढळून आलेल्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (०७-०९-२०२१) :** (१) होय, हे खरे आहे.

एच.डी.पी.ई. पाईप पुरवठा करणे या योजनेसाठी पात्र १५८ लाभार्थ्यांपैकी ५ लाभार्थी वगळता उर्वरित लाभार्थ्यांना पाईप वाटप करण्यात आल्याची पोच दिसून आली नाही. तसेच व्यवसायासाठी सायकल पुरवठा करणे या योजनेंतर्गत खरेदी करण्यात आलेले ३२० नग लाभार्थ्यांना वाटप करण्यात आले असल्याची नोंद दिसून आली नाही.

प्रकल्प कार्यालयास प्राप्त २८ मळणी यंत्रांपैकी ९ मळणी यंत्रांच्या पोहच पावत्या व ११७ शिलाई मशीनपैकी ५३ मशीनच्या लाभार्थ्यांच्या पोहच पावत्या उपलब्ध नाहीत. तर, कृषी अवजारांचे वाटप या योजनेंतर्गत १०० लाभार्थ्यांपैकी फक्त १४ लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळाल्याचे दिसून आले व उर्वरित ८६ लाभार्थ्यांच्या पोहच पावत्या दिसून आलेल्या नाहीत.

(२) व (३) सन २००४ ते २००९ या कालावधीत राबविण्यात आलेल्या विविध योजनांची छाननी करुन अहवाल सादर करण्यासाठी सन २०१४-१५ मध्ये गायकवाड समिती स्थापन करण्यात आलेली होती. सदर समितीने केलेल्या चौकशीदरम्यान एच.डी.पी.ई. पाईप (सन २००६-०७ व २००७-०८), सायकल पुरविणे, थ्रेशर मशिन पुरविणे, शिवण मशिन पुरविणे व प्रशिक्षण देणे (सन २००३-०४, २००४-०५ व २००७-०८), शेती औजारे पुरविणे, पी.व्ही.सी. पाईप पुरविणे या योजनांमध्ये तत्कालीन प्रकल्प अधिकारी यांनी शासनाची फसवणूक केल्याची बाब निदर्शनास आली आहे.

गायकवाड समितीने केलेल्या शिफारशींनुसार तत्कालीन प्रकल्प अधिकाऱ्यांवर योजनानिहाय सिडको, औरंगाबाद पोलीस स्टेशन येथे प्रथम खबर अहवाल क्र. २३८, दिनांक १८/०७/२०१८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला असून पोलीस स्टेशन, सिडको, औरंगाबाद यांचेस्तरावरुन पुढील कार्यवाही सुरु आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री.राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.